रायगड, गुरुवार, दि. २ मे २०२४

# कृषीवल

किंमत ४ ₹

## पवार पुन्हा गरजले

**मुंबई :** पंतप्रधान मोदी यांनी कितीही म्हटलं की घटना बदलायचं नाही, तरीही त्यांचे खासदार मात्र घटना बदलायचं म्हणतात. मग मोदी आणि त्यांचे खासदार वेगवेगळं कसं काय बोलतात, अशी तोफ काँग्रेसचे अध्यक्ष शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी डागली. शिराळ्यातील हातकणंगले मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार सत्यजित पाटील सरुडकर यांच्या प्रचारार्थ झालेल्या सभेत ते बोलत होते. या सभेला संबोधित करताना शरद पवार म्हणाले की, देशाची घटना बदलायची आहे, असे मोदींचेच खासदार सांगतात. उत्तर प्रदेशमधील खासदार ४०० पेक्षा जागा द्या, म्हणजे घटना बदलता येईल, असे म्हणाले.

## पुढील चार दिवस उष्णतेची लाट

**मुंबई :** संपूर्ण मे महिन्यात देशातील तापमानात वाढ होणार असून, कोकणाबरोबर संपूर्ण महाराष्ट्रात पुढील चार दिवस उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे, असा अंदाज भारतीय हवामान विभागाने दिला आहे. मुंबईसह संपूर्ण कोकणातील सात जिल्ह्यात मात्र उष्णतेच्या लाटेबरोबर घाम काढणाऱ्या दमट वातावरणाचाही पाच दिवसांत सामना करावा लागेल, असा इशाराही देण्यात आला आहे. पुढील पाच दिवस म्हणजे, शनिवार दि.४ मेपर्यंत उष्णतेच्या लाटेची शक्यता जाणवत असल्याची माहिती तज्ज्ञांनी दिली आहे. मात्र, ६ व ७ मे रोजी कदाचित कमाल व किमान अशा दोन्हीही तापमानात काहीशी घट होण्याची शक्यता वर्तविली आहे.




● महाराष्ट्र दिनानिमित्त खालापूर येथे तहसील कार्यालयात शेकाप सरचिटणीस आ. जयंत पाटील यांच्या हस्ते झेंडावंदन करण्यात आले. यावेळी तहसीलदार आयुब तांबोळी, अन्य शासकीय अधिकारी, कर्मचारी, खालापूर पोलीस ठाण्याचे अधिकारी आणि शेकापचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. (छायाचित्र : संतोषी म्हात्रे)

# तटकरे नव्हे, 'कट'करे!

**। पेण । प्रतिनिधी ।**

३२ रायगड लोकसभा निवडणुकीचे इंडिया आघाडीचे लोकसभेचे उमेदवार अनंत गीते यांच्या प्रचारची जाहीर सभा महात्मा गांधी वाचनालयाच्या मैदानावर पार पडली. त्यावेळी बोलताना माजी मंत्री तथा आमदार जितेंद्र आव्हाड यांनी सुनील तटकरे यांचा खरपूस समाचार घेत तटकरेंचा लेखाजोखा पेणच्या जनतेसमोर मांडला. हे सुनील तटकरे नाहीत, हे तर सुनील 'कट'करे आहेत. यांनी पवारसाहेबांचे घर फोडले आहे. पवारसाहेबांनी याला काय कमी केलं होतं? घरात पाच-पाच पदं दिली होती. तरीही पवारसाहेबांचे घर फोडले, असा घणाघातही आव्हाडांनी केला.

२०१४ ला पराभव झाल्यानंतर आपल्याला सत्तेतच राहायला पाहिजे, अशी भुन-भुन नेहमीच सुनील तटकरे आणि धनंजय मुंडे यांनी केली त्यांना भाजपासोबत

•› पान ५ वर

### तटकरेंनीच पवारसाहेबांचे घर फोडले; आ. जितेंद्र आव्हाडांचा घणाघात




### तटकरेंचा बुरूज ढासळला आहे : अनंत गीते



सध्या रायगडामध्ये अशा काही तोफा धडधड करतात, त्यामुळे तटकरेंचा बुरूज पुरता नेस्तनाबूत झाला आहे. त्याला आता कुणीही वाचवू शकत नाही. जरी आमदार रविशेठ पाटील आणि धैर्यशील पाटील यांनी वाचवण्याचा प्रयत्न केला, तरी तो बुरूज आता काही वाचवता येणार नाही. अबकी बार सुनील तटकरे रायगडमधून हद्दपार. २०२४ मध्ये रायगडच्या राजकारणातून सुनील तटकरे यांचा राजकीय अंत माझ्या हातूनच होणार होता, म्हणूनच मला ही नियतीने संधी दिली आहे. मला सर्वांना आवाहन करायचे आहे की, मतदान करायचे आहे, आपल्याला मतं विकायची नाहीत आणि आपण सुज्ञ आहात, आपण मत विकणार नाहीत तर आपण मलाच मतदान करणार, असा विश्वास अनंत गीते यांनी दर्शविला. या सभेचे प्रास्ताविक शिवसेनेचे युवा नेते समीर म्हात्रे यांनी केले. सभेसाठी व्यासपीठावर शेकापचे सुरेश खैरे, महादेव दिवेकर, पी.डी. पाटील, अतुल म्हात्रे, काँग्रेसचे राजा ठाकूर, चंद्रकांत पाटील, विष्णूभाई पाटील, अविनाश म्हात्रे, सुरेंद्र म्हात्रे, दिपश्री पोटफोडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

### गीतेंसाठी रायगडकर रस्त्यावर : आ. जयंत पाटील

ही रायगडची जनता गीतेंसाठी आता रस्त्यावर उतरली आहे. सुनील तटकरेंचा भ्रष्टाचार रायगडच्या जनतेला आता माहिती झाला आहे. आज पेण तालुका सिंचनापासून वंचित आहे, ते या तटकरेंमुळेच. खारेपाटाच्या जनतेच्या घशाला कोरड पडली आहे ती या तटकरेंमुळेच. अनंत गीते हे आज रायगडमधून सर्वाधिक मताधिक्य घेणारे महाराष्ट्रातील खासदार असतील, अशी मी प्रतिज्ञा घेतलेली आहे. आ. पाटील पुढे म्हणाले, तटकरेंकडे एवढा पैसा आला कुठून? हे पेणकरांनी



•› पान ५ वर

**आजचा अग्रलेख**

**अरेरे, काय ही दुर्दशा**

**वे|ध|क**

### सप्तपदीशिवाय हिंदू विवाह अमान्य

**नवी दिल्ली :** हिंदू विवाह हा एक संस्कार असून, हा नाच-गाण्याचा किंवा जेवणाचा दारू पिण्याचा कार्यक्रम नाही. त्याची पवित्रता लक्षात घेणे गरजेचे आहे. फक्त रजिस्ट्रेशन केल्याने लग्न वैध होत नाही. विवाह पूर्ण होण्यासाठी मंत्रोच्चार व सप्तपदीशिवाय हिंदू विवाह मान्य नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. बुधवारी एका प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती बी. नागरत्ना यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला आहे.

### आता महागाईवर बोला : ठाकरे

**मुंबई :** मोदींचं सरकार हे गझनी सरकार असून, मोदींनी आता गाईवर बोलतात तसं महागाईवर बोललं पाहिजे. चाय पे चर्चा करता, तसं मुद्द्यांवरही चर्चा केली पाहिजे, असं थेट आव्हान शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी हातकणंगलेतून केलं. महाविकास आघाडीचे हातकणंगले लोकसभेचे उमेदवार सत्यजित आबा पाटील सरुडकर यांच्या प्रचारार्थ झालेल्या सभेत ते बोलत होते. महाराष्ट्रदिनी हुतात्म्यांना वंदन करून त्यांनी महाराष्ट्र लुटणाऱ्यांवर हल्लाबोल केला. यावेळी त्यांनी विरोधकांचा खरपूस समाचार घेतला.

# सुनील तटकरे दगाबाज

### आ. जयंत पाटील कडाडले

**। खोपोली । प्रतिनिधी ।**



सुनील तटकरे दगाबाज असून, त्यांनी बॅ. ए.आर. अंतुले यांच्यापासून माझ्यापर्यंतच्या सर्वांनी मदत करूनही आम्हाला पाठ दाखवली. शरद पवार यांनी तर त्यांच्या घरातल्या जवळपास प्रत्येकाला आमदारकी दिली. त्यांना खासदार केलं, तरीही त्यांनी त्यांची बदनामी केली. आता या सगळ्याचा समाचार म्हणून लोकसभेच्या निवडणुकीत बदला घेणारच, असा निर्धार माझ्यासह प्रत्येक कार्यकर्त्यांनी केला असल्याचे शेकापचे सरचिटणीस आ. जयंत पाटील यांनी प्रतिपादन केले.

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी आ. जयंत पाटील यांनी बुधवारी (दि. १) खालापुरात पक्षाच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली. या बैठकीत खालापूर तालुका चिटणीस किशोर पाटील, ज्येष्ठ नेते संतोष जंगम, खोपोली शहर चिटणीस अविनाश तावडे, रवींद्र रोकडे, कैलास गायकवाड,

•› पान ५ वर

# 'गीतेंना मतांची आघाडी मिळणार'



**शेकापने माणगावात अनेकांना मोठे केले; पण जे कोणी पक्ष सोडून गेले, त्यांचा काहीही परिणाम पक्षावर झाला नाही. आजही शेकापच्या सभांना जिल्ह्यात चांगला प्रतिसाद मिळत आहे. लवकरच माणगाव तालुका चिटणीसची नियुक्ती करू, असे आ. पाटील यांनी सांगितले.**

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

जिल्ह्यात हवा तटकरेंच्या विरोधात असून, इंडिया आघाडीने चांगली बांधणी केली आहे. रायगड लोकसभा निवडणुकीत श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघातून अनंत गीते प्रचंड मतांची आघाडी घेतील, असा विश्वास शेकापचे सरचिटणीस आ. जयंत पाटील यांनी माणगाव येथील बैठकीत बोलताना व्यक्त केला.

रायगड लोकसभा मतदारसंघाची निवडणूक येत्या ७ मे रोजी होत असून, त्यासंदर्भात माणगाव तालुक्यातील शेतकरी कामगार पक्षाच्या प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक बुधवार दि.१ मे रोजी माणगावात आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी आ. जयंत पाटील यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.

या बैठकीला पक्षाचे ज्येष्ठ नेते अस्लम राऊत, गोविंद पवार, माजी समाज कल्याण सभापती अशोक गायकवाड, हसनमिया बंदरकर, नामदेव शिंदे, चंद्रकांत सत्वे, दिलीप उतेकर, इनायत टाके, युवा नेते स्वप्नील दसवते, मोर्बा माजी सरपंच विलास गोठल, माजी उपसरपंच अमोल मोहिते, देगाव सरपंच सुषमा वाघमारे, उपसरपंच दिनेश गुगले, नितीन वाघमारे, नरेश दळवी, अय्याज मुल्ला, अजीम बंदरकर, सुभाष अर्बन, रामदास जाधव आदींसह

•› पान ५ वर

# गुंडगेवासियांचा निवडणुकीवर बहिष्कार

### घनकचरा प्रकल्प हटविला जात नसल्याची तक्रार

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत शहरातील गुंडगे गावातील डम्पिंग ग्राऊंड हटवण्यासंदर्भात घनकचरा प्रकल्प हटाव संघर्ष समितीच्या माध्यमातून कर्जत नगरपरिषदेवर मोर्चा काढला होता. त्याचबरोबर वेळोवेळी त्यांना निवेदन दिले आहे; परंतु तरीदेखील कर्जत नगरपरिषद याकडे लक्ष देत नसल्याने आम्हाला हा निवडणुकीवर बहिष्कार घालण्याचा पर्याय शिल्लक राहिला आहे. म्हणून आम्ही गुंडगे परिसरातील पंचशील नगर, संत रोहिदास नगरमधील रहिवासी येणाऱ्या लोकसभेच्या निवडणुकीवर जाहीर बहिष्कार घालत आहोत,

•› पान ५ वर



# पिण्याच्या पाईपलाइन बाजूलाच गॅसलाईन



### भविष्यात मोठा धोका उद्भवण्याची शक्यता

**। पाताळगंगा । वार्ताहर ।**

पाली खोपोली रस्त्यावर पाली फाटा ते देवन्हावे रस्त्यावर महानगर गॅसलाईनचे काम रस्त्याच्या कडेलाच आणि पिण्याच्या पाईपलाइन बाजूलाच सुरू आहे. भविष्यात पाण्याची पाईलाईन किंवा गॅसलाईन फुटल्यास मोठा धोका होऊ शकतो तसेच रस्त्याच्या बाजूलाच खोदकाम सुरू आहे. बॅरिकेट्स आणि सुरक्षेची व्यवस्था नसल्यामुळे अपघाताची शक्यता आहे.

ॲडलॅब इमॅजिकाजवळ सीएनजी पंपासाठी महानगर पाईलाईन टाकण्याचे काम अनेक महिन्यांपासून सुरू आहे. रस्त्याचा काही अंतर सोडून खोदकाम केलं पाहिजे; परंतु सर्व नियम ढाब्यावर बसवून रस्त्याच्या कडेलाच पाईपलाइन टाकली जात आहे. खोदकाम केल्यानंतर रस्त्याच्या बाजूला बॅरिकेट्स लावले नसल्यामुळे अनेक अपघात घडले आहेत. तसेच देवन्हावे ग्रामपंचायत हद्दीत पिण्याच्या पाण्याची पाईपलाइन टाकली आहे, त्याशेजारीच गॅसलाईन टाकण्यात आली आहे. भविष्यात पाईपलाईन फुटल्यास जोडणीसाठी वेल्डिंगचा वापर केल्यास महानगर गॅसलाईन गळतीमुळे मोठा अनर्थ घडू शकतो, अशी चिंता स्थानिकांनी व्यक्त केली.

**सलमान गोळीबार प्रकरण**

### आरोपीची तुरुंगात आत्महत्या


**। मुंबई । प्रतिनिधी ।**

बॉलिवूड अभिनेता सलमान खानच्या वांद्रे येथील घरावर गोळीबार केल्याप्रकरणी अटकेत असलेला आरोपी अनुज थापन याने आत्महत्या केली. गळफास घेतल्याची माहिती समजताच पोलिसांनी तातडीने रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी आरोपीला मृत घोषित केले. या घटनेने एकच खळबळ उडाली आहे. सकाळी ११.३० ते १२ वाजण्याच्या सुमारास पोलीस कोठडीची पाहणी करण्यास गेले असता आरोपीने गळफास घेतल्याचे समोर आले. सलमान खानच्या वांद्रे येथील घरावर गोळीबार केल्याप्रकरणी मुंबई पोलिसांनी चारजणांना अटक केली होती.

# वरंध घाट आठ दिवसांकरिता खुला

**। महाड । प्रतिनिधी ।**

महाड-पुणे-पंढरपूर मार्गावरील वरंध घाट १ एप्रिल ते ३० मे या कालावधीमध्ये सर्व प्रकारच्या वाहतुकीसाठी बंद करण्यात आला होता; परंतु निवडणूक, लग्नसराई व सुटीचा हंगाम यामुळे प्रवाशांची गैरसोय होऊ नये, याकरिता ८ मेपर्यंत हा घाट व मार्ग वाहतुकीसाठी खुला करण्यात आला आहे. यामुळे ऐन सुट्टीच्या हंगामामध्ये प्रवाशांची होणारी गैरसोय दूर होणार आहे.



वरंध घाटामध्ये रस्ता दुपदरीकरणाचे व घाटामध्ये संरक्षण भिंती बांधण्याचे काम सुरू असल्याने वरंध गाव ते रायगड जिल्हा हद्द येथील वाहतूक बंद करण्याचा जिल्हा प्रशासनाने यापूर्वीच निर्णय घेतल्याने येथील वाहतूक बंद करण्यात आलेली होती. त्यामुळे प्रवाशांना ताम्हिणी घाटमार्गे तसेच आंबेनळी घाटमार्गे प्रवास करावा लागत होता. महाडमार्गे भोर, पुणे, पंढरपूर, फलटण या भागात जाण्यासाठी

•› पान ५ वर

### शाळा उडवून देण्याची धमकी

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

दिल्लीमध्ये विविध शाळांमध्ये बॉम्बस्फोट घडवण्याची धमकी देण्यात आली आहे. द्वारका आणि नोएडामधील दिल्ली पब्लिक स्कूल, मदर मेरी आणि संस्कृती स्कूल, वसंत कुंज येथील डीपीएस आणि साकेत येथील एमिटी अशा दिल्ली, द्वारका आणि नोएडामधील जवळपास ५० ते ६० शाळांना बॉम्बस्फोटाने उडवून देण्याची धमकी देण्यात आल्याची प्राथमिक माहित समोर आली आहे. द्वारका आणि अशोक विहार मधील प्रूडेन्स स्कूलला देखील धमकी देण्यात आली आहे. शाळांना धमकी ईमेलद्वारे देण्यात आली आहे. दिल्ली पोलिसांकडून शाळांमध्ये चौकशी करण्यात येत आहे. आतापर्यंत पोलिसांना कोणतीही संशयास्पद वस्तू सापडलेली नाही.

# धान्य वितरणात येणार गतिमानता

### रेशन दुकानात फोरजी ई-पॉस मशीन

**प्रमोद जाधव**

**। अलिबाग ।**

तांत्रिक समस्यांमुळे टूजी ई पॉस मशीन डोकेदुखी ठरत होती. शिधापत्रिकाधारकांची नोंद होण्यास अडचणी निर्माण झाल्या होत्या. त्यामुळे आता रेशन दुकानांमध्ये फोरजी ई-पॉस मशीन दाखल झाली आहे. त्यामुळे धान्य वितरण व्यवस्थेत गतिमानता येणार आहे. त्यामुळे लाभार्थ्यांना त्यांच्या हिश्श्याचे रेशन तात्काळ मिळण्यास मदत होणार आहे.

रेशन दुकानांतील धान्य वितरणाचे कामकाज गतिमान व्हावे यासाठी सरकारने २०१८ पासून ई-पॉस मशीन मशीनद्वारे धान्य वितरण करण्याची व्यवस्था केली. मात्र, 'नव्याचे नऊ दिवस' या उक्तीप्रमाणे कामकाज झाल्याचे दिसून आले. इंटरनेट सुविधांचा अभाव, टूजी ई-पॉस मशीनच्या बटणांमध्ये बिघाड, मध्येच मशीन हँग होणे, तांत्रिक अडचणींमुळे त्वतिर थंब होत नव्हते, अशा तक्रारी वाढल्या होत्या. मशीनमधील त्रुटींमुळे धान्य वितरण प्रणाली विस्कळित झाली होती. या कारणावरून ग्राहक आणि रेशन दुकानदार यांच्यात वादही झाले आहेत.

•› पान ५ वर



**फोर जी मशीनविषयी**

**या मशीनमध्ये पाच हजार मेगा क्षमतेची बॅटरी आहे. तसेच या मशीनमध्ये दोन सीम कार्ड असणार आहेत. एक वोडाफोन किंवा एअरटेल आणि दुसरे जिओचे असणार आहे. हे मशीन पूर्णपणे भारतीय बनावटीचे असणार आहे.**

फोर जी मशीन आल्यामुळे दुकानामध्ये काम करणे अधिक सोयीस्कर होणार आहे. आधीच्या मशीन टू जी तंत्रज्ञानावर आधारित होत्या, त्यातच टूजी तंत्रज्ञान जवळपास बंद झालं होतं. त्यामुळे धान्यवाटपाची गती कमी होती. त्यामुळे धान्य वाटपात अडचणी यायच्या. आता आपल्याकडे आयआरआयएस नावाचे स्कॅनरही उपलब्ध असून, ज्याच्या अंगठ्याचे ठसे उमटत नाहीत, त्यांच्या डोळ्यांच्या बुबुळांचे फोटो घेऊनही आता धान्य वितरणाची व्यवस्था आहे. त्यामुळे निश्चित धान्य वितरण करणे सोपे होणार आहे.

– कौस्तुभ जोशी, तालुका सचिव, रेशन दुकानदार संघटना

जिल्ह्यातील १५ तालुक्यांमध्ये एकूण १४४३ रास्त भाव दुकाने आहेत. एकूण शिधापत्रिकांची संख्या चार लाख ५८ हजार ९२३ असून, एकूण लाभार्थींची संख्या १७ लाख ५५ हजार ५०९ आहे. जिल्ह्यातील अंत्योदय शिधापत्रिकाधारकांची संख्या ८३ हजार ५०४ असून, लाभार्थींची संख्या दोन लाख ५७ हजार ३१३ आहे.

# खोदाकामात सापडला बाप्पा

### कार्तिकेय, शिवलिंगाच्या पुरातन मूर्तीचाही समावेश

**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल तालुक्यातील श्रीक्षेत्र तळोजा मजकूर येथील पुराणकालीन शिव मंदिर जीर्णोद्धार करत असताना त्या ठिकाणी खोदकाम करताना गणपती बाप्पा, कार्तिकेय आणि शिवलिंग यांच्या पुरातन मूर्ती सापडल्याने परिसरातील ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

प्रभू श्रीराम नवमीच्या पवित्र दिनाच्या निमित्ताने शिवसेना रायगड जिल्हा संपर्कप्रमुख बबन पाटील यांनी शिव मंदिर बांधण्याचा संकल्प केला होता. श्रीक्षेत्र तळोजा मजकूर येथील पुराणकालीन शिवमंदिर जीर्णोद्धार आणि पूजन गुरुवर्य यशवंत महाराज यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी शिवसेना रायगड जिल्हा संपर्कप्रमुख बबन पाटील, उपजिल्हा प्रमुख रामदास पाटील, भाजप नेते प्रल्हाद केणी यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बबन पाटील यांनी शिवमंदिर बांधण्याचा संकल्प केला होता. त्यानुसार मंदिराच्या जीर्णोद्धाराचे काम करत असताना त्या ठिकाणी गणपती बाप्पा, कार्तिकेय आणि शिवलिंग यांच्या पुरातन मूर्ती सापडल्याची माहिती बबन पाटील यांनी दिली. त्यानुसार अनेक ग्रामस्थांनी त्या ठिकाणी दर्शन घेतले आहे.



**खोदकामात सापडलेल्या मूर्तीमुळे मानवी संस्कृतीच्या अस्तित्वाच्या भूतकाळातील खुणांचा अभ्यास करता येणार आहे. दोन भिन्न कालखंडातील धागे एकमेकांशी जुळवत या संदर्भातील विश्वसनीय माहिती पुढे आणण्यासाठी संशोधन होण्याची आवश्यकता असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.**




## वे|ध|क

### हेमंत गोडसे यांना उमेदवारी जाहीर

**नाशिक:** शिवसेनेकडून हेमंत गोडसे यांना नाशिकमधून उमेदवारी जाहीर झाली आहे. त्यामुळे नाशिकचा सस्पेन्स अखेर संपला आहे. गेल्या अनेक दिवसांपासून नाशिकच्या जागेवरुन महायुतीमध्ये घोळ सुरु होता. अखेर आज हेमंत गोडसे यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले आहे. शिवसेनेने अधिकृतपणे याची घोषणा केली आहे.नाशिकची जागा कुणाकडे जाणार याबाबतही विविध तर्क लावले जात होते. काही दिवसांपूर्वी या जागेसाठी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या छगन भुजबळ यांच्या नावाची जोरदार चर्चा सुरु होती. पण, त्यांनी आपण माघार घेत असल्याचं जाहीर केलं होतं. उमेदवारी जाहीर करण्यास वेळ होत असल्याने हा निर्णय घेतला असल्याचं ते म्हणाले होते.

### नगरमधून एमआयएम'ची माघार

**अहमदनगर :** अहमदनगर मतदारसंघात 'एमआयएम'ची उमेदवारी अखेर औटघटकेची ठरली. विरोधकांकडून झालेली टीका आणि मुस्लिम समाजातून झालेला विरोध लक्षात घेता पक्षाने आपली उमेदवारी मागे घेतली आहे. उमेदवार तथा पक्षाचे जिल्हाध्यक्ष डॉ. परवेज अशरफी यांनी आज अखेरच्या दिवशी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला. माघारी संबंधी उमेदवार किंवा पक्षाची अधिकृत भूमिका अद्याप पुढे आलेली नाही. मात्र, एमआयएमचा उमेदवार असल्यास भाजपचा फायदा होतो, म्हणून मुस्लिम समाजातूनच या उमेदवारीला विरोध झाल्याचे सांगण्यात येते. अशरफी सध्या नॉट रिचेबल असल्याने त्यांची बाजू समजू शकली नाही. मुस्लिमांची एकजूटही यातून दिसून आली.

### शांतिगिरी महाराजांचा अर्ज दाखल

**नाशिक :** महायुतीमध्ये नाशिक लोकसभा मतदारसंघाचा ट्विस्ट काही संपता संपत नसल्याचं चित्र आहे. विद्यमान शिवसेना खा. हेमंत गोडसे यांचा पत्ता कट होणार असल्याची चर्चा आहे. अशातच महायुतीतर्फे निवडणूक लढवण्यास इच्छुक असलेल्या स्वामी शांतिगिरी महाराज यांनी नाशिक लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केला. पक्षाच्या नावापुढे शिवसेना असं लिहिलं आहे, मात्र, त्यांच्याकडे एबी फॉर्म नसल्याची माहिती आहे.स्वामी शांतिगिरी महाराज यांनी माध्यमशी बोलताना सांगितलं, की आमच्या लोकसभेच्या मंडळींना निर्णय घेतला आहे. सार्वत्रिक निवडणूक जनता जनार्दन कमिटीच्या मार्फत होत आहे.

### मोरे यांना रोड रोलर चिन्ह

**पुणे:** बहुजन आघाडीचे उमेदवार वसंत मोरे हे पुणे मतदारसंघातून निवडणूक लढवत आहेत. मोरे यांना निवडणूक चिन्ह जाहीर करण्यात आले. मोरे यांना रोड रोलर हे चिन्ह देण्यात आले आहे. मोरे यांनीच रोड रोलर हे चिन्ह मिळाल्याचे जाहीर केले आहे.

# सत्तेची मस्ती भाजपच्या डोक्यात गेली

## सत्तेचे सिंहासन उद्ध्वस्त करा पवारांचा एल्गार

**। अहमदनगर । प्रतिनिधी ।**

गेल्या दहा वर्षांत भारतीय जनता पक्षाने सत्तेचा गैरवापर केला. सत्तेची मस्ती त्यांच्या डोक्यात गेली आहे. त्यांच्या सत्तेचे सिंहासन आपल्याला उध्वस्त करायचे आहे. नगर जिल्हयातही अनेक प्रश्न आहेत. त्या सर्वांचे उत्तर नीलेश लंके आहे. त्यामुळे महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांना तुम्ही दिल्लीत पाठवा, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी केले.

यावेळी बोलताना पवार म्हणाले, निवडणूक ही सत्ताधाऱ्यांना हिशोब मागण्याची वेळ असते. तसा हिशोब सध्या आम्ही मागत आहोत. या सरकारने काहीच केले नाही. जे केले, ते सत्तेचा गैरवापर करून विरोधक आणि जनतेला त्रास देण्याचे काम केले.



या सरकारची आता हुकूमशाहीकडे वाटचाल सुरू झाली. त्यामुळे या निवडणुकीत आम्ही त्यांच्या सत्तेचे सिंहासन उद्धस्थ केल्याशिवाय राहणार नाही, असेही पवार म्हणाले.

नगर जिल्ह्याविषयी बोलताना त्यांना विखे पाटील परिवारवर जोरदार टीका केली. पवार म्हणाले, पदश्री विठ्ठलराव विखे पाटलांनी सहकारी साखर कारखाना काढला. पण नंतरच्या पिढीने काय केले? त्यांची तिसरी पिढी आता राजकारणात आहे. मात्र वडीलधाऱ्यांचा मान ठेवण्याचे सौजन्यही त्यांच्याकडे नाही. नगर जिल्ह्यात अनेक प्रश्न आहेत, त्या सर्वांचे उत्तर नीलश लंके हे आहे. त्यामुळे आम्ही हा उमेदवार दिला असून त्याला दिल्लीला पाठवा, असे आवाहन पवार यांनी केले.

वचनं तुम्ही पाळली नाही अन् शिव्या आम्हाला देता? शरद पवारांनी मोदींना ऐकवलं, भाषण गाजवलं महाविकास आघाडीचे उमेदवार लंके यांच्या प्रचारासाठी राहुरीत आयोजित सभेत पवार बोलत होते. यावेळी माजी राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे, जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके, आ. लहू कानडे, माजी आ. डॉ. प्रसाद तनपुरे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

# हुकूमशहांकडे महाराष्ट्र देणार नाही

## ठाकरे यांनी मोदी, शहांवर डागली तोफ



**। पुणे । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्रासाठी ज्यांनी बलिदान दिले, ते हुतात्मे महाराष्ट्राची होणारी लूट आणि पायदळी तुडविली जात असलेली अस्मिता पाहत आहेत. कोणासाठी बलिदान दिले, असे त्यांना वाटत असेल. त्यामुळे प्राण गेला तरी चालेल, हुकूमशहांच्या ताब्यात महाराष्ट्र जाऊ देणार नाही, अशा शब्दांत उद्धव ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा यांच्यावर मंगळवारी तोफ डागली. संयुक्त महाराष्ट्र समिती फोडण्याचे काम जनसंघाने केल्याचा आरोपही त्यांनी या वेळी केला.

महाराष्ट्र दिनाच्या पूर्वसंध्येला ही सभा होत आहे, असे सांगून ठाकरे म्हणाले, स्वातंत्र्यलढ्या प्रमाणे संयुक्त महाराष्ट्र लढ्यात तेव्हाचा जनसंघ सहभागी झाला नव्हता. माझे आजोबा आणि वडील अग्रभागी होते. जनसंघ संयुक्त समितीत सामील झाला, परंतु जेव्हा निवडणूक लढवायची वेळ आली, तेव्हा समिती फोडण्याचे पाप या जनसंघाने केले होते. भाजपने कायमच महाराष्ट्रावर अन्याय केला. त्यामुळे मी शपथ घेऊ सांगतो, महाराष्ट्रासाठी ज्यांनी मर्दासारख्या गोळ्या छातीवर घेतल्या, तो महाराष्ट्र हुकूमशहांच्या कचाट्यात जाऊ देणार नाही.

मोदी यांनी पवार यांचे नाव न घेता भटकती आत्मा, असा उल्लेख केला होता. त्यावर ठाकरे म्हणाले, भटकती आत्मा आहे, तशी एक वखवखलेली आत्मादेखील आहे. जी महाराष्ट्रात सगळीकडे फिरून सभा घेत आहे. ती आत्मा स्वत:साठी आणि मित्रांसाठी लढत आहे. त्यांनी जरा शेतकऱ्यांकडेही बघावे. आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या घराकडे आणि त्यांच्या पत्नीच्या तुटलेल्या मंगळसूत्राकडे बघावे.

महाविकास आघाडीच्या बारामती लोकसभेच्या उमेदवार सुप्रिया सुळे, पुणे लोकसभेचे उमेदवार रवींद्र धंगेकर, शिरूरचे उमेदवार डॉ. अमोल कोल्हे आणि मावळचे उमेदवार संजोग वाघेरे यांच्या प्रचारार्थ वारजे येथे आयोजित सभेत ठाकरे बोलत होते.

# दोन्हीकडं फिरणाऱ्या कार्यकर्त्यांना अजित पवारांचा सज्जड दम

**। पुणे । प्रतिनिधी ।**

बारामतीमध्ये नणंद विरुद्ध भावजय असा सामना रंगणार आहे. बारामतीच्या या लढाईत अजित पवार आणि शरद पवार यांच्यात संघर्ष आहे. आज उपमुख्यमंत्री अजित पवार बारामती दौऱ्यावर होते. बारामती तालुक्यातील शिर्सुफळ येथे सुनेत्रा पवार यांच्या प्रचारासभेचं आयोजन करण्यात आलं होतं. यावेळी अजित पवारांनी कार्यकर्त्यांना सज्जड दम दिला आहे.



सभेत अजित पवार हे त्यांच्या कार्यकर्त्यांना उद्देशून म्हणाले, जर तुम्ही माझ्या बाबतीत काही चूक केली तर पुन्हा माझ्याकडं पायरी चढायचं नाही. काहीजण माझी सभा झाली रे झाली की, समोरच्या पार्टीकडं जातात. बिनविरोध मी पदे दिली. मात्र, तुम्ही त्यांचा प्रचार करत आहात. कुंकू लावायचा असेल तर एकाचेचं लावा. माझे तरी लावा नाही तर त्यांचं तरी लावा, हा काय चाटाळपणा लावलाय? असा पश्न अजित पवार यांनी कार्यकर्त्यांना विचारला आहे. यावेळी अजित पवार यांनी आ. रोहित पवार यांचा संदर्भ घेत म्हणाले की, उद्या कदाचित ते बोलतील अजित दादा दम द्यायला लागलेत.

# संजय पांडेंची लोकसभेतून माघार

**मुंबई:** मुंबईचे माजी पोलीस आयुक्त संजय पांडे यांनी निवडणुकीतून माघार घेतली आहे. पांडे मुंबई उत्तर मध्य येथून लोकसभा निवडणूक लढणार असल्याच्या चर्चा सुरू होत्या. स्थानिकांच्या आग्रहाखातर संजय पांडे निवडणूक लढवणार होते. मात्र, त्यांनी या निवडणूकीतून माघार घेतल्याची माहिती समोर आली आहे.

दरम्यान, उत्तर मध्य मुंबईतून महाविकास आघाडीने वर्षा गायकवाड यांच्या नावाची घोषणा केली आहे. तर महायुतीकडून ज्येष्ठ विधीज्ञ उज्ज्वल निकम यांना तिकिट देण्यात आलं आहे. अशातच मुंबई पोलीस दलाचे माजी आयुक्त संजय पांडे देखील या ठिकाणी निवडणूक लढवण्यास इच्छुक होते. मुंबईतून तिरंगी तढत होण्याची शक्यता वर्तवण्यात आली होती.

# राजन विचारे यांचा उमेदवारी अर्ज दाखल

**। पनवेल। प्रतिनिधी ।**

शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे ठाणे लोकसभेचे इंडिया आघाडीचे उमेदवार राजन विचारे यांनी ठाण्यातील कोपनेश्वर मंदिर येथे दर्शन घेऊन धर्मवीर आनंद दिघे साहेबांच्या शक्ती स्थळावर आशीर्वाद घेऊन सोमवारी (दि. २९) जोरदार शक्तिप्रदर्शन करत आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. शिवसेना नेते आदित्य ठाकरे यांच्या उपस्थितीत भव्य रॅली काढण्यात आल्याने ठाण्यात महाविकास आघाडीची वज्रमूठ पाहायला मिळाली.

शिवसेना आणि ठाण्याचे जुने नाते आहे. ही लढाई पक्ष आणि बाप चोरणाऱ्या, संविधान बदलणाऱ्या आणि महाराष्ट्राला



दिल्लीमध्ये झुकवणाऱ्यांच्या विरोधात असल्याचे ठाकरे यांनी सांगितले. यावेळी वरूण सरदेसाई, जितेंद्र आव्हाड, विक्रांत चव्हाण, विजय कदम, मनोज आखरे, सलुजा सुतार, पूनम पाटील, विठ्ठल मोरे, द्वारकानाथ भोईर, प्रभाकर म्हात्रे, केदार दिघे, अनिश गाढवे, मुजफ्फर हुसैन, राजन राजे, व इंडिया आघाडीचे प्रमुख नेते व पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चार अध्यात्मिक गुरु लोकसभेच्या आखाड्यात

**। नाशिक । प्रतिनिधी ।**

कुंभनगरी नाशिकमध्ये यंदा लोकसभा निवडणुकीत अध्यात्मिक गुरुंनीउडीघेतलीअसूनयंदानाशिकच्या निवडणुकीत अध्यात्मिक आखाडा बघायला मिळणार आहे. यात काही आध्यात्मिक गुरूंनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केलाय, तर काहींनी उमेदवारी अर्जाची खरेदी केली आहे.

नाशिक लोकसभा निवडणुकीच्या रणांगणात राजकीय पक्षांमधील दावेदारांबरोबरच अनेक अध्यात्मिक गुरु देखील यंदा इच्छुक आहेत. बहुतांश इच्छुकांनी प्रचार आणि वरिष्ठ पातळीवर लॉबिंग सुरु केलीय. काहींना पक्षाच्या उमेदवारीची प्रतीक्षा असली, तरी काही अध्यात्मिक गुरुंनी स्वतंत्र उमेदवारीच्या दृष्टीनं प्रचारात आघाडी घेतलीय. यात अध्यात्मिक गुरु शांतिगिरी महाराज, स्वामी श्री कंठानंद, सिद्धेश्वरानंद सरस्वती महाराज आणि महंत अनिकेत शास्त्री महाराज यांचा समावेश आहे.

# सरकार पाडण्यात मोदींचा आशीर्वाद

**। सातारा । प्रतिनिधी ।**

माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी माध्यमांशी संवाद साधत असताना पंतप्रधान मोदी यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. 'महाराष्ट्रातील सरकार पाडायला आणि पक्ष फोडायला पंतप्रधान नरेंद्र मोदींचा स्पष्ट आशिर्वाद होता. मोदींच्या संमतीनेच सगळं झालंय. तसंच हा राजनैतिक भ्रष्टाचार आहे,'' असा त्यांनी आरोप केलाय.

चव्हाण म्हणाले, 'हा भ्रष्टाचार दोन प्रकारचा आहे. एक अर्थिक भ्रष्टाचार आहे. हा निवडणूक रोख्यांच्या माध्यमातून पुढं आला. पैसे दिले की नंतर कंत्राट मिळते.



सीबीआय, ईडींची छापेमारी झाली की चार आठ दिवसात पैसे जमा होतात. त्यानंतर छापे बंद होतात. दुसरा भ्रष्टाचार हा वैचारिक, राजनैतिक आहे. हा भ्रष्टाचार सरकार पाडण्यावेळी झाला. अशा राजनैतिक भ्रष्टाचारामुळं यापुढं कुठलंच निवडून आलेलं सरकार टिकू शकणार नाही' अशी भीती पृथ्वीराज चव्हाण यांनी व्यक्त केली.

'पंतप्रधान मोदींना अर्थव्यवस्थेचं संचालन करण्यात अपयश आलेलं आहे. त्यामुळं महागाई आणि बेरोजगारीचा प्रश्न निर्माण झालाय. मोदी सरकारला शेती विधेयकं मागे घ्यावी लागली. त्यामुळं सरकारनं धोरणात कांदा, गहू, भात, साखरेवर निर्यातबंदी आणली. अशा धोरणामुळं शेतकरी अत्यंत अडचणीत आला आहे.' सत्ताधाऱ्यांविरोधातील मतांची विभागणी होऊ नये, हा इंडिया आघाडी निर्माण करण्यामागचा उद्देश होता. आमची मतं विभागली गेली नाहीत, तर नक्की इंडिया आघाडीला बहुमत मिळेल, असा विश्वास चव्हाण यांनी व्यक्त केला.

# नाना पटोलेंचा मोदींवर हल्लाबोल

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या महाराष्ट्र दौऱ्यावरुन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी जोरदार टीका केली आहे. मोदींनी सोलापूर, सातारा आणि पुण्यातील प्रचारसभेतून नेहमीचंच काँग्रेस विरोधी रडगाणं गायलंय. मोदींना प्रचारासाठी सातत्यानं महाराष्ट्रात यावं लागतं, यावरुन भाजपाचा दारूण पराभव होत असल्याचं स्पष्ट दिसतं आहे. महाराष्ट्रातील मोठे उद्योग, गुंतवणूक आणि रोजगार गुजरातला पळवून नेत असताना मोदींना महाराष्ट्राची आठवण झाली नाही, कांद्यावरील निर्यात बंदी उठवताना त्यांना महाराष्ट्राची आठवण झाली नाही. पण आज पराभव दिसू लागल्यानं पंतप्रधान मोदींना महाराष्ट्राची आठवण झाली का?असा खोचक सवालही नाना पटोले यांनी केला.

प्रसार माध्यमांशी संवाद साधत असताना नाना पटोले म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाला आणि संविधानानं दिलेल्या आरक्षणाला राष्ट्रीय स्वयंसेवक



संघ आणि भाजपाचा पहिल्या पासूनच विरोध आहे.


मागील १० वर्षांत धनगर, आदिवासी, मराठा समाजाला आरक्षण देतो म्हणून त्यांची घोर फसवणूक करणाऱ्या भाजपावर आता जनता विश्वास ठेवणार नाही. ओबीसींच्या आरक्षणाचा घोळ घालून राजकीय प्रतिनिधीत्व मिळण्यापासून या समाजाला वंचित ठेवण्याचं पाप नरेंद्र मोदी, देवेंद्र फडणवीस आणि भाजपानं केलंय. ४०० जागा जिंकल्या की आरक्षण बदलू असं जाहीर सांगणारे मोदींचे खासदार आणि मंत्रीच आहेत. पण जनता भाजपाला घरी बसवणार याची जाणीव होताच मोदींनी भाषा बदलली.

आरक्षणाचे खरे विरोधक भाजपा, आरएसएस असून संधी मिळाली तर ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संविधान बदलणार हे स्पष्ट आहे, असा गंभीर आरोप पटोले यांनी केला.

# खोटे आश्वासन देणाऱ्या मोदींना हद्दपार करा : बी. व्ही. श्रीनिवास

**। धाराशिव । प्रतिनिधी ।**

खोटे आश्वासन देऊन नागरिकांची दिशाभुल करत दहा वर्ष सत्तेत असलेल्या मोदी सरकारला या निवडणूकीतुन हद्दपार करा. भारतीय संविधान बदलण्याचे षडयंत्र आखले जात आहे. विकास कामांच्या नावाने बनवाबनवी करण्यात मोदी सरकार पटाईत आहे.देशात महागाईने कळस गाठल्याने सर्वसामान्यांचे हाल होत आहेत. हे चित्र बदलायचे असल्यास



इंडिया आघाडीला पवित्र मतदान करावे.

सर्वसामान्यांचे प्रश्न संसदेत मांडण्यासाठी कर्तत्वतत्पर असलेले खा. ओमराजे निंबाळकर यांना पुन्हा निवडूण द्यावे असे आवाहन युवक काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष बी. व्ही. श्रीनिवास यांनी केले.

तालुक्यातील पेठसांगवी येथे सोमवारी (ता.२९) युवक काँग्रेसच्या कार्यकर्ता मेळावा व धाराशिव लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार ओमराजे निंबाळकर यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत ते बोलत होते.

## महाविकास आघाडीचे शक्तिप्रदर्शन

**डोंबिवली :** कल्याण लोकसभा मतदारसंघात शिवसेनेच्या दोन गटातील उमेदवारांत चुरशीची लढत होणार आहे. मंगळवारी महाविकास आघाडीतील शिवसेना ठाकरे गटाच्या उमेदवार वैशाली दरेकर यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. तत्पूर्वी डोंबिवलीत युवा सेना नेते आदित्य ठाकरे, आ. जितेंद्र आव्हाड यांच्या उपस्थितीत रॅली काढण्यात आली.



यावेळी इंडिया आघाडीतील घटकपक्षांची मोठी गर्दी दिसून आली. कल्याण लोकसभा मतदारसंघ हा शिवसेनेचा बालेकिल्ला आहे. निवडणूकांच्या काळात कल्याण डोंबिवलीतील शिवसेनेचे शक्तीप्रदर्शन म्हणजे एक वेगळा उत्साह, जोशपूर्ण वातावरण शहरात पहायला मिळते. शिवसेनेतील फुटीनंतर पहिलीच लोकसभेची निवडणूक होत आहे.

# महाराष्ट्राची भाकरी खाऊन गुजरातची चाकरी

**। पुणे । प्रतिनिधी ।**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अजित पवार यांनी खा. अमोल कोल्हे यांच्यावर जोरदार टीका केली होती. तसेच नगरसेवक व्हायचं असेल तर कामाला लागा. निधी वाटपाबाबतही त्यांनी सूचक वक्तव्य केलं होते. खा. कोल्हे यांना विचारलं असता ते म्हणाले की, समोरच्या उमेदवाराचा पराभव दिसायला लागला की, अशा पद्धतीने दबाव तंत्र हे वापरलं जात आहे. पण सर्वसामान्य जनतेने ही निवडणूक हाती घेतली आहे.

खा. अमोल कोल्हे म्हणाले, नगरसेवक होण्यापेक्षा देशातील



महागाई कमी होणार का? शेतकऱ्यांच्या शेतमालाला हमीभाव मिळणार का? बेरोजगार तरुणांना रोजगार मिळणार का? हे प्रश्न महत्त्वाचे आहेत. आज गुजरातच्या शेतकऱ्यांना एक न्याय आणि महाराष्ट्राच्या शेतकऱ्यांना एक न्याय दिला जात आहे. महाराष्ट्राची भाकरी खाऊन गुजरातची चाकरी का केली जात आहे? असा खोचक प्रश्न यावेळी खा. कोल्हे यांनी अजित पवार यांना विचारला .

महाविकास आघाडीचे शिरूर लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार डॉ. कोल्हे यांच्या प्रचारासाठी पुण्यातील हडपसर मतदारसंघात प्रचार रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी त्यांनी विविध मुद्द्यांवर प्रतिक्रिया दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी पुणे दौऱ्यावर असून शिरूर, बारामती, पुणे आणि मावळ लोकसभा मतदारसंघाच्या अनुषंगाने ते सभा घेत मोठं शक्ती प्रदर्शन करणार आहेत. याबाबत अमोल कोल्हे यांना विचारलं असता ते म्हणाले, आज सर्वसामान्य जनता ही इंडिया आघाडीच्या मागे उभी आहे. आज देशाच्या पंतप्रधानांना इथे यावं लागत आहे. यातच इंडिया आघाडीचा विजय आहे असे म्हटलं.

बारामती तसेच शिरूर लोकसभा मतदारसंघात अजित पवार यांच्याकडून दमदाटी केली जात असल्याचं संजय राऊत यांनी म्हटलं आहे. याबाबत कोल्हे यांना विचारलं असता ते म्हणाले की, वारंवार निधीबाबत सांगितलं जात आहे. निधी हा सर्वसामान्य नागरिकांच्या घरातील हा पैसा असतो. निधी हा कोणाच्याही मालकीचा नाही. अशा दमदाटीला सर्वसामान्य जनता या माध्यमातून उत्तर देणार आहे.

# ठाण्याची जागा शिवसेनेकडे

## मिरा भाईंदर भाजपात नाराजी

**। भाईंदर । प्रतिनिधी ।**

ठाणे लोकसभा जागेवर शिवसेनेचा उमेदवार घोषित झाल्यामुळे मिरा भाईंदर भाजपमध्ये नाराजीचे वातावरण पसरले आहे. त्यामुळे याचा थेट फटका महायुतीच्या प्रचारावर होणार असल्याची शक्यता आहे.

ठाणे लोकसभा क्षेत्रात भाजपची वाढलेली संघटनात्मक ताकद पाहता ही जागा आपल्या वाटेलाच यावी, अशी मागणी भाजप कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांकडून मागील काही दिवसापासून आक्रमकपणे करण्यात येत होती. तर मिरा भाईंदर भाजप पक्षाने शिवसेना उमेदवारासाठी काम करणार नसल्याचे थेट जाहीर केले



होते. त्यामुळे या जागेवरून भाजप-शिवसेनेत रस्सीखेच सुरु असल्याची जोरदार चर्चा होती.अखेर ही जागा शिवसेनेला स्वतःकडे ठेवण्यात यश आले असून नरेश म्हस्के यांच्या नावाची अधिकृत उमेदवार म्हणून बुधवारी घोषणा करण्यात आली. मात्र, ही घोषणा झाल्यानंतर मिरा भाईंदर भाजपच्या गोट्यात नाराजीचे वातावरण पसरले आहे.

## वे|ध|क

# बारणेंच्या प्रचाराला पदाधिकाऱ्यांची नाराजी

**पनवेल :** मावळ मतदारसंघात महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे विरुद्ध ठाकरे गटाचे उमेदवार संजोग वाघेरे यांच्यात लढत आहे. पहिल्यांदाच लोकसभेची संधी मिळालेले संजोग वाघेरे यांनी प्रचाराची पायमूळ गेल्या काही महिन्यांपासून रोवण्यास सुरू केली आहेत. पुन्हा मावळचा गड उद्धव ठाकरे यांना मिळवून देण्यासाठी वाघेरे सज्ज झाले आहेत. दोन्ही उमेदवार स्वतःचा प्रचार करण्यासाठी स्टार प्रचारकांना त्याचबरोबर महायुती आणि महाविकास आघाडीतील नेत्यांना आणण्यासाठी प्रयत्नशील आहेत. २०१९ मध्ये झालेल्या लोकसभेचा पराभव अजित पवार अद्यापही विसरले नसतील. मावळ लोकसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची नुकतीच शिरूर, बारामती, मावळ लोकसभेसाठी नियोजन बैठक पार पडली. या बैठकीला मावळमधील अनेक स्थानिक दिग्गज नेते यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते. आम्हाला उमेदवार श्रीरंग बारणे माहीत नाहीत. अजित पवार यांनी दिलेल्या आदेशानुसार आम्ही महायुतीच्या उमेदवाराचं काम करणार आहोत असे मावळ राष्ट्रवादीच्या नेत्यांनी नाराजीयुक्त मत व्यक्त केले आहे.

# मावळमध्ये ऐंशी पार, ५८ हजार मतदार

**पनवेल :** लोकसभा निवडणुकीतील सर्वांत मोठ्या आणि भौगोलिकदृष्ट्या वेगळेपण असलेल्या मावळ लोकसभा मतदारसंघातील प्रत्येक मतदारांपर्यंत पोहचण्याचे आव्हान निवडणूक आयोगाने स्वीकारले आहे. या मतदारसंघात पश्चिम महाराष्ट्र आणि कोकण अशा भौगोलिक भागाचा समावेश होतो. या मतदारसंघात २५ लाख नऊ हजार ४६१ मतदारांना मतदान केंद्रांवर आणण्यासाठी आयोगाने कंबर कसली आहे. सध्याच्या नोंदणीनुसार पुरुष १३ लाख १० हजार ४३४, स्त्री मतदार ११ लाख ९८ हजार ८६८



आणि तृतीयपंथी १५९ मतदार आहेत. यामध्ये वयाची ऐंशी पार केलेले ५७ हजार ९६८; तर शंभरी गाठलेले १ हजार ३५८ मतदार आहेत. मावळ लोकसभा मतदारसंघात एकूण २ हजार ५६२ मतदान केंद्र आहेत, आचारसंहिता पालनासाठी ११४ पथकांची नियुक्ती केली असल्याचेही त्यांनी सांगितले. लोकसभा मतदारसंघातील प्रत्येक विधानसभा मतदारसंघात महिला, युवक, दिव्यांग यांच्याद्वारे संचलित प्रत्येकी एक असे तीन व एक आदर्श अशी चार मतदान केंद्रे असतील. महिला केंद्रांवर सर्व अधिकारी, कर्मचारी महिला असतील. युवकांच्या केंद्रावर सर्व युवक; तर दिव्यांग केंद्रावर सर्व दिव्यांग कर्मचारी, अधिकारी असतील, असे प्रत्येक विधानसभा मतदारसंघात चार याप्रमाणे संपूर्ण मतदारसंघात २४ विशेष किंवा आदर्श मतदान केंद्रे असतील. १३ मे रोजी सकाळी सात ते सायंकाळी सहा या वेळेत मतदान होईल.

# तटकरेंची अलिबागमधील प्रचार सभा ठरली फेल

## बोटावर मोजण्या इतकेच कार्यकर्ते, अनेक खुर्च्या रिकाम्या

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

रायगड लोकसभा मतदार संघातील निवडणूकीचे मतदान येत्या ७ मे रोजी असणार आहे. प्रचार तोफा पाच मे रोजी सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास थंडावल्या जाणार आहेत. त्यामुळे प्रचारासाठी अवघे तीनच दिवस शिल्लक राहिले आहेत. प्रचाराचा वेग सर्व ठिकाणी वाढला असून प्रचाराचा अंतिम टप्पा संपण्याच्या मार्गावर आहे. महायुतीचे उमेदवार सुनील तटकरे यांच्या प्रचारानिमित्त मंगळवारी मुरूडसह अलिबाग तालुक्यात सभा घेण्यात आल्या.



सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास अलिबागमधील छत्रपती शिवाजी महाराज चौक या ठिकाणी सभा आयोजित केली होती. या सभेला कार्यकर्ते मोठ्या संख्येने येतील या आशेने महायुतीने अनेक खुर्च्या मांडल्या होत्या. रात्री आठ नंतर सभेला सुरुवात झाली. अनेकांची भाषणे झाली. मात्र, तटकरेंची ही सभा फेल ठरल्याचे दिसून आले. या सभेमध्ये बोटावर मोजण्या इतकेच कार्यकर्ते सहभागी झाले होते. बाकीच्या खुर्च्या रिकाम्या होत्या. तटकरेंच्या या प्रचार सभेला मोजकीची मंडळी उपस्थित असल्याने महायुतीने स्वतःचे हस करून घेतल्याची चर्चा जोरात रंगली होती. तसेच छत्रपती शिवाजी महाराज चौकात घेतलेली सभा रस्त्यात असल्याने अनेकांची मोठी गैरसोय झाल्याचे दिसून आले.

# निवडणूक कर्मचाऱ्यांना माणगाव येथे प्रशिक्षण



**। म्हसळा । वार्ताहर ।**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ अंतर्गत येत्या ७ मे रोजी होणाऱ्या मतदाननिमित्त १९३ श्रीवर्धन विधानसभा मतदार संघातील निवडणूक कर्तव्यावर नेमणूक करण्यात आलेल्या मतदार केंद्रास्तरीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण मंगळवार (दि.२९) माणगाव येथील ज. गांधी मेमोरियल हॉल येथे आयोजित करण्यात आले होते.

तसेच ईव्हीएम व्हीव्हीपॅट हाताळणे बाबत प्रशिक्षण अशोक दादा साबळे विद्यालयामध्ये संपन्न झाले. उपविभागीय अधिकारी तथा सहाय्यक निवडणूक निर्वाचन अधिकारी महेश पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या या शिबिरास श्रीवर्धन तहसीलदार महेंद्र वाकलेकर, म्हसळा तहसीलदार समीर घारे, तळा तहसीलदार स्वाती, म्हसळा निवासी नायब तहसीलदार गणेश तेलंगे आदी मान्यवर उपस्थित होते.

# स्वच्छता मोहिमेत मतदानाबाबत जनजागृती

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

खोपोली नगर परिषद अंतर्गत स्वच्छता मोहिमेचे विशेष आयोजन करण्यात आले होते, यामुळे तरी शंभर टक्के मतदानाबाबत जनजागृती करण्याचे आवाहन मुख्याधिकारी तथा प्रशासक डॉ. पंकज पाटील यांनी केले. वरची खोपोली प्रभाग ते मुंबई पुणे महामार्गावरील हनुमान मंदिर मुळगाव यादरम्यानच्या भागात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या अभियानात स्वच्छतेची शपथ मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील यांनी उपस्थित अधिकारी वर्ग व कर्मचाऱ्यांना दिली.

मुख्याधिकारी पंकज पाटील यांच्या नेतृत्वाखाली उपमुख्य अधिकारी गौतम भगले, पथदीप विभागाचे सुरेश तरडे, उद्यान विभागाचे निलेश लोखंडे, नगर रचना विभागाचे प्रणय ठाकूर, लेखा विभागाचे सिद्धार्थ खामकर, आरोग्य विभागाचे युवराज विरनक, बांधकाम विभागाचे अनिल वाणी यांच्यातील सह सर्व कर्मचारी वर्गाने या स्वच्छता विशेष मोहिमेत सहभाग घेतला. शहर स्वच्छ राखण्याबाबत नागरिकांनी नगरपरिषद प्रशासनाला सहकार्य करावे, आपले परिसर स्वच्छ ठेवावे, झाडे लावा झाडे जगवा, पर्यावरणाचे महत्त्व समजून घ्या, यावर इतर अनेक जनजागृतीच्या बाबतीत मुख्याधिकाऱ्यांनी सर्वांना मार्गदर्शन केले.

# घोटवडेमध्ये हनुमान उत्सव जल्लोषात





**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील घोटवडे येथील ग्रामस्थ मंडळ व महिला मंडळ यांच्या वतीने मंगळवारी (दि.३०) श्री हनुमान उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

### शेकाप सरचिटणीस आ. जयंत पाटील यांनी घेतले दर्शन

शेकाप सरचिटणीस आ. जयंत पाटील यांनी गावात जाऊन देवाचे दर्शन घेतले. यावेळी ग्रामस्थांच्या वतीने गावकीचे अध्यक्ष रविंद्र शिंदे यांच्या हस्ते आ.पाटील यांचे स्वागत करण्यात आले.

सकाळी श्रींची आरती करून श्री हनुमान उत्सवाला सुरुवात झाली. त्यानंतर दुपारी भजनांचा कार्यक्रम घेण्यात आला. रात्री नऊनंतर श्रींची पालखी, मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीसोबत भजन, किर्तन, बेंजोचा समावेश होता. यावेळी ज्येष्ठ मंडळींसह तरुणाई मोठया संख्येने सहभागी झाले होते. गावात ठिकठिकाणी पूजेच्या साहित्यांसह खाद्य पदार्थ, खेळणी, घरगूती साहित्यांची दुकाने सजली होती. उत्सवानिमित्त घोटवडे गावात दाखल झालेल्या अनेक भाविकांनी खरेदीचा आनंद लुटला. त्यामुळे गावात यात्रेचे स्वरूप निर्माण झाले होते. उत्सव आनंदात व मंगलमय वातावरणात साजरा करता यावा यासाठी ग्रामस्थांच्या वतीने समिती तयार करण्यात आली होती. समितीच्या पदाधिकारी, सभासदांनी चोखपणे भूमिका बजावत उत्सव उत्साहात साजरा करण्यासाठी प्रचंड मेहनत घेतली.



# नांदगावमध्ये घरोघरी अनंत गीतेंचा प्रचार

**मुरूड जंजिरा :-** रायगड लोकसभा मतदारसंघातील निवडणुकीला पाच दिवस शिल्लक असतांना मुरुड तालुक्यात महाविकास आघाडीचा प्रचाराचा धुरळा उडाला असून महाविकास आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांचा नांदगावमधील आघाडीच्या कार्यकर्त्यांनी घरोघरी जाऊन मतदारांच्या प्रत्यक्ष भेटी घेऊन प्रचार केला. नांदगावच्या सरपंच सेजल घुमकर, ॲड. इस्माईल घोले, माजी उपसरपंच अस्लम हलडे, सुदेश घुमकर, नरेश कुबल, शादाब हलडे, मंजुम घोले, भक्ती चोरघे, नौशाद शाबान,शादाब हलडे, मुअज्जम कासकर, हलडे शिरसिकर, देऊळकर आदी अनेक कार्यकर्त्यांनी गीतेंचा प्रचार करीत इंडिया आघाडीला मतदान करण्याचे आवाहन केले.

# संजोग वाघेरे-पाटील यांच्या प्रचारात शेकापक्षाचे कार्यकर्ते आघाडीवर

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे- पाटील यांच्या प्रचारात शेकापक्ष आघाडीवर आहे. मावळ लोकसभा मतदारसंघात उरण आणि पनवेल विधानसभा मतदारसंघात शेकापक्षाने इंडिया आघाडीचे विजयासाठी जोरदार आघाडी घेतली आहे.

तालुक्यात शेतकरी कामगार पक्षाचे कार्यकर्ते यांच्या जवळ मोठे जनमत आहे. शेकापचा बालेकिल्ला समजले जाणाऱ्या तालुक्यात आजही शेकाप जनाधार मिळवून आहे. त्यामुळे पक्षाचे सरचिटणीस आ. जयंत पाटील यांनी इंडिया आघाडीसाठी सर्व ताकद पणाला लावला आहे. रायगड



आणि मावळ लोकसभा मतदारसंघात महाविकास आघाडीचे उमेदवार शेकाप निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. मावळ मतदारसंघात संजोग वाघेरे पाटील यांच्या प्रचाराची जबाबदारी शेकापक्षाने पनवेल आणि उरण मतदारसंघात आपल्या खांद्यावर घेतली आहे. कर्जत तालुक्यात शेतकरी कामगार पक्षाचे नेते आणि जिल्हा परिषदेचे माजी सभापती नारायण डामसे आणि पक्षाचे तालुका चिटणीस श्रीराम राणे यांच्या नेतृत्वाखाली शेकापचे नेते विलास थोरवे, पुंडलिक शिनारे, महेश म्हसे, बबन भालेराव, प्रकाश फराट, माजी सभापती गजानन पेमारे, जिल्हा बँकेचे माजी संचालक राजू हजारे, राजेद्र विरले, कृष्णा बदे, धर्मा निरगुडे, कृष्णा शिंगे, रवींद्र भोईर, पांडुरंग बदे, युवक कार्यकर्त्यांनी शेतकरी कामगार पक्ष म्हणून महाविकास आघाडीच्या प्रचारात आघाडी घेतली आहे. शेकापाकडून शिवसेना ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांच्या एक पाऊल पुढे जावून प्रचार केला जात असल्याने शेतकरी कामगार पक्षाच्या १०० टक्के मतदारांनी संजोग वाघेरे -पाटील यांच्यासाठी मतदान करतील असे शेकाप तालुका चिटणीस श्रीराम राणे यांनी स्पष्ट केले आहे.

# ‘काँग्रेस पक्षाची भरघोस मते देऊन गीतेंना खासदार बनविणार’




**। खारेपाट । प्रतिनिधी ।**

रायगड ३२ रायगड लोकसभा काँग्रेस पक्षाची भरघोस मते देऊन इंडिया आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांना रायगडचे खासदार बनविणार असा विश्वास ३२ रायगड लोकसभा मतदार संघ काँग्रेस समन्वयक राजाभाऊ ठाकूर यांनी खारेपाट शहापूर मतदार संघातील वैजाळी हाशिवरे येथे इंडिया आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांच्या प्रचारार्थ सभेत मार्गदर्शन करताना व्यक्त केला. ते पुढे म्हाले कि, अनंत गीते यांना मत म्हणजे इंडिया आघाडीचे देशाचे भावी प्रंतप्रधान राहुल गांधी यांना मत असणार आहे, म्हणून ७ मे रोजी होणाऱ्या लोकसभेच्या मतदानात इंडिया आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांच्या निशाणी मशाल समोरील बटण दाबून मोठ्या मताने विजयी करा असे आवाहन त्यांनी उपस्थितांना केले.

या सभेला शेकाप सरचीटणीस आ. जयंत पाटील, युवा नेते अस्वाद पाटील, सवाई पाटील, शे.का.प महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील, शिवसेना जिल्हाप्रमुख सुरेंद्र म्हात्रे, शशिकांत ठाकूर, दर्शना पाटील, सरोज डाकी, शैला पाटील, अनील पाटील, सत्यविजय पाटील, सिध्दनाथ पाटील, राजाराम गावंड सुशिल पाटील, कॉग्रेस विभागीय अध्यक्ष विजय पाटील, निशिकांत मोकल ॲड प्रथमेश पाटील, ॲड. प्रफुल्ल पाटील, कॉग्रेसचे पदाधीकारी चंद्रकांत मोकल यांनी सर्वांचे आभर व्यक्त केले.





● निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अलिबागमध्ये रायगड पोलिसांनी जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण अलिबाग शहरात संचलन केले.



# पिंपरी-चिंचवडच्या विकासात आमचे मोठे योगदान

**। पिंपरी । प्रतिनिधी ।**

गेल्या दहा वर्षात मावळचे खासदारपद असून सुद्धा त्यांनी मतदारसंघात एकही नवीन प्रकल्प आणला नाही, अशी टीका मावळचे महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांनी केली. बारणे यांचा अभ्यास कमी आहे असे वाघेरे म्हणाले, पिंपरी-चिंचवड शहराच्या विकासात आमचे मोठे योगदान आहे.



मी आणि माझे वडिलांनी पिंपरी-चिंचवड महापालिकेत महापौर म्हणून काम केले आहे. माझी पत्नी गेली पंधरा वर्षे नगरसेविका आहे, त्यामुळे बारणे यांचा अभ्यास कमी असल्याचा टोला लगावला.

दहा वर्षात मावळ मतदारसंघात एकही नवीन प्रकल्प आला नाही. मतदारसंघात औद्योगिकपट्टा मोठा असून कामगारांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष झाले आहे. पर्यटनाला चालना दिली नाही. पाणी, रस्ते, वाहतूक कोंडीचा प्रश्न गंभीर झाला आहे. पवना नदी स्वच्छतेकडे दुर्लक्ष झाले आहे. पावणेचार लाखांचे लीड घेणार असे संजोग वाघेरे म्हणाले.

# नोंदणीकृत पक्षाचे उमेदवार बिघडवणार

**। पनवेल । वार्ताहर ।**

मावळ लोकसभा मतदार संघात महाविकास आघाडी आणि महायुतीच्या उमेदवारामध्ये थेट लढत होणार आहे. मात्र महायुती आणि आघाडीच्या उमेदवारांसोबत राष्ट्रीय स्थरावरील पक्ष म्हणून नोंद असलेल्या मायावती यांच्या बहुजन समाज पार्टीचे हत्ती हे निवडणूक चिन्ह घेऊन आपला उमेदवार मावळच्या रींगणात उतरवला असून, नोंदणीकृत पक्षाचे इतर ११ उमेदवार देखील रिंगणात असल्याने हे उमेदवार घेणार असलेली मते कोणत्या उमेदवारांच्या विजयाची गणित बदलतात हे पाहणं औस्त्युक्याचे ठरणार आहे. मावळ लोकसभा मतदार संघात १३ मे रोजी निवडणुका पार पडणार आहेत.

महाविकास आघाडी आणि महायुतीच्या उमेदवारांनी प्रचारात आघाडी घेतली आहे. दोन्ही उमेदवारांचे कार्यकर्ते सध्या प्रचारात व्यस्थ असून, ग्रामीण तसेच शहरी भागात घरोघरी उमेदवारांचा प्रचार सुरु असल्याने महायुती आणि महाविकास आघाडीच्या उमेदवारामध्येच प्रमुख लढत होणार आहे. मात्र त्याच वेळी रिंगणात असलेल्या इतर उमेदवारांना मात्र, दुर्लक्षित केले जात असून, ऐनवेळी विजयाची गणित बदलण्याची क्षमता असलेले हे उमेदवार प्रमुख उमेदवारांना डोकेदुखी ठरण्याची शक्यता आहे.

### आपचा पदाधिकारी अपक्ष म्हणून रिंगणात

दिल्ली चे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या नेतृत्वाखालील आम आदमी पार्टीचा इंडिया आघाडीत समावेश आहे. मावळ लोकसभा मतदार संघात आपचे कार्यकर्ते महाविकास आघाडीच्या उमेदवाराच्या प्रचारात धडाडीने भाग घेत आहेत, असे असले तरी पनवेल विधानसभा मतदार संघातील प्रमुख पदाधिकारी असलेले चिमाजी शिंदे हे अपक्ष म्हणून निवडणूक लढवत असल्याने वंचितची मत त्यांच्याकडे जाण्याची शक्यता आहे.

### वंचितचे राजाराम पाटील बसपाच्या हत्तीवर

२०१९ साली पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत राजाराम पाटील हे प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित बहुजन आघाडी कडून निवडणूक रिंगणात उतरले होते. पाटील यांनी त्या वेळी तब्बल ७५ हजारा पेक्षा जास्त मते घेत आपली ताकत दाखवली होती. स्थानिक प्रकल्पग्रसतांच्या बाजूने कायम सिडको तसेच इतर प्राधिकरणा विरोधात नेहमीच आक्रमक भूमिका घेणाऱ्या पाटील यांना यंदा वंचितने उमेदवारी नाकारल्याने ते बसपाच्या हत्ती या निवडणूक चिन्हावर निवडणूक लढत आहेत.

### वंचितकडून माधवी जोशी

वंचित बहुजन आघाडीकडून ऑटो रिक्षा या चिन्हावर माधवी जोशी यांना निवडणूक रिंगणात उतरवण्यात आले आहे. जोशी यांनी राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षातून नुकताच वंचितमध्ये प्रवेश केला असला तरी मावळ लोकसभा मतदार संघातून निवडणूक लढण्याच्या उद्देशाने त्यांनी मागील वर्षभरापासून तयारी केली आहे. त्यामुळे राष्ट्रवादी कॉग्रेस पक्ष मतदारांचा देखील त्यांना काही प्रमाण पाठिंबा मिळण्याची शक्यता आहे. आगरी समाजाचा उमेदवार म्हणून कार्ड खेळल्यास पनवेल, उरण आणि कर्जत या आगरी समाजाचे प्राबल्य असलेल्या भागातून त्यांना चांगला प्रतिसाद मिळण्याची शक्यता आहे.

# अरेरे, काय ही दुर्दशा

एकेकाळी भाजप स्वतःला इतरांपेक्षा वेगळा पक्ष मानत असे. काँग्रेसवाले सगळे भ्रष्टाचारी व अनीतीमान तर भाजपवाले सगळे शुध्द चारित्र्यवाले असा त्यांचा स्वतःचाच समज होता. राष्ट्रीय स्वयंसेवक संघवाले असे सांगत की त्यांना राष्ट्रीय चारित्र्य घडवायचे आहे. पण या सगळ्या चारित्र्यवाल्यांची पार दुर्दशा उडाली आहे. देशात जे काही घडते आहे ते पाहून न पाहिल्यासारखे करण्याची वेळ आली आहे. ज्या रवीन्द्र वायकर, यामिनी जाधव यांना कालपर्यंत तुरुंगात पाठवण्याची तयारी केली त्यांना आता लोकसभेत पाठवण्यासाठी ताकद पणाला लावावी लागणार आहे. त्यांना मत म्हणजे मोदींना मत असे म्हणावे लागणार आहे. हेसुध्दा ठीक असे म्हणण्याची वेळ इतरत्र आली आहे. कर्नाटकात भाजपचा मित्रपक्ष असलेल्या जनता दलाच्या प्रज्वल रेवण्णा याचे भयंकर लैंगिक अत्याचारांचे प्रकरण उघडकीस आले आहे. प्रज्वल हा माजी पंतप्रधान देवेगौडा यांचा नातू व हसन लोकसभा मतदारसंघातला उमेदवार आहे. त्याच्या प्रचारासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी १४ एप्रिलला कर्नाटकात गेले होते. या प्रज्वल याने हजारो स्त्रियांवर लैंगिक अत्याचार करून त्यांचे व्हिडिओ बनवले व त्यांना ब्लॅकमेल केले असा आरोप आहे. प्रज्वल आता परदेशात पळून गेला आहे. या प्रकरणाच्या चौकशीसाठी विशेष तपास पथक स्थापन झाले असून जनता दलाने प्रज्वल याला पक्षातून काढून टाकले आहे. एरवी हा एखादा वैयक्तिक गुन्हा असता तर त्याची राजकीय चर्चा होण्याचे कारण नव्हते. पण प्रज्वलच्या या भानगडींची कल्पना भाजपच्या नेत्यांना पूर्णपणे होती असे आता उघड होत आहे. तेथे आमदारकीची निवडणूक लढवलेले स्थानिक भाजप नेते देवराजगौडा यांनी गेल्या वर्षी एक मुलाखत देऊन प्रज्वलच्या या उद्योगांची वाच्यता केली होती. आपल्या पत्नीलाही त्याने या भानगडीत गुंतवले व आपल्याविरुध्द फितवले असे देवराजगौडा यांचे म्हणणे होते.

### भाजपची डोळेझाक

प्रज्वल यांचा ड्रायव्हर कार्तिक यालाही असाच अनुभव आला होता. लैंगिक अत्याचार करून व्हिडिओ बनवण्याच्या प्रज्वलच्या उद्योगांची त्याला चांगलीच माहिती होती. त्याच्याकडे अशा काही क्लिप्सही होत्या. प्रज्वलकडे तो बरीच वर्षे चालक म्हणून होता. पण नंतर प्रज्वलने त्याची जमीन हडपण्याचा प्रयत्न केला. त्यात कार्तिकचे भांडण झाले. तो बाहेर पडला. त्याने या क्लिप्स देवराज यांना दिल्या होत्या. देवराज यांनी त्या भाजपच्या वरिष्ठ नेत्यांना पाठवल्या होत्या. या प्रकरणाला पाठीशी घालणाऱ्या जनता दलाशी भाजपने समझोता करता कामा नये असे त्यांचे म्हणणे होते. प्रज्वलला उमेदवारी द्यायलाही अर्थातच त्याचा विरोध होता. एरवी, नैतिकतेचे ढोल बडवणाऱ्या भाजपच्या नेत्यांनी खरे तर देवराज यांचे म्हणणे मान्य करायला हवे होते. किमान प्रज्वलला उमेदवारी देताना विचार करायला हवा होता. पण निवडणुकीतील फायदा आणि सत्ता यापलिकडे मोदी व अमित शाह यांच्या भाजपला सध्या काहीही दिसत नाही. दक्षिण कर्नाटकात वोक्कलिग ही जात प्रबळ आहे. देवेगौडांना सोबत ठेवले तर त्यांची मते भाजपला मिळतील एवढाच हिशेब त्यांनी केला. प्रज्वलला उमेदवारी दिलीच व त्याच्या प्रचाराला मोदी येतील अशी व्यवस्था झाली. देवराज यांच्या मुलाखतीपासून या प्रकरणाची जोरदार चर्चा कर्नाटकात होती. प्रज्वलच्या म्हणून अनेक व्हिडिओ क्लिप्स सर्वत्र फिरत होत्या. पण ठोस तक्रार नव्हती. मधल्या काळात प्रज्वलने उच्च न्यायालयात जाऊन या क्लिप्स प्रसारित करण्यावर मनाई हुकूम मिळवला होता. हा आपल्या बदनामीचा कट आहे असे त्याचे म्हणणे होते. त्यामुळे त्याच्या निवडणुकीचे मतदान पार पडले. मात्र त्याच्या दुसऱ्या दिवशी एक पीडित महिला पुढे आली व तिने तक्रार दिली. शरमेने मान खाली घालायला लावणारी बाब म्हणजे ही महिला ६८ वर्षांची आहे व रेवण्णा कुटुंबात अनेक वर्षे स्वयंपाकाचे काम करीत असे. पण प्रज्वलने तिच्यावरही अत्याचाराचा प्रयत्न केला.

### संघ काय करतो?

आता त्याच आधारे राज्य सरकारने चौकशी सुरू केली आहे. हे प्रकरण गंभीर आहे याची राज्य व केंद्रातील भाजप नेत्यांना कल्पना होती. तरीही त्यांनी निव्वळ राजकीय स्वार्थापोटी ते दडपण्याचा प्रयत्न केला. आता याबाबत टीका सुरू केल्यावर त्यांनी कर्नाटकातील काँग्रेस सरकारवरच याची जबाबदारी ढकलण्याचा प्रयत्न केला. राज्य सरकारने इतक्या दिवसात यावर का कारवाई केली नाही असा सवाल अमित शाह यांनी केला आहे. त्याचे उत्तर स्पष्ट आहे. देवराजगौडा यांनी काही जाहीरपणे केलेले आरोप हे ढोबळ होते. त्यानंतरही पीडित महिला पुढे आल्या नव्हत्या. अशा प्रकरणात तक्रार नसेल तर चौकशीला मर्यादा पडतात. दुसरे म्हणजे निव्वळ देवराज यांच्या मुलाखतीवरून तपास सुरू केला असता तर त्याला राजकीय रंग देऊन भाजपने प्रकरण भलतीकडेच नेले असते. आता ते तसे होणार नाही. देवराज यांनी स्पष्ट कल्पना दिलेली असूनही भाजपच्या नेत्यांनी प्रज्वल व त्याच्या पक्षाला का उचलून धरले हा यातला महत्वाचा मुद्दा आहे. तो बाजूला पडण्यासाठी शाह हे आतादेखील हे घाणेरडे राजकारण करीत आहेतच. अर्थात, भाजपवाले मातृशक्ती वगैरे कितीही बाता मारत असले तरी प्रत्यक्षात महिलांच्या प्रतिष्ठेची त्यांना यत्किंचितही चाड नाही. तशी ती असती तर साक्षी मलिक व फोगाट भगिनी इत्यादींना ब्रिजभूषण शरण सिंग या भाजपच्या खासदाराविरुध्द दिल्लीत धरणे द्यावे लागले नसते. या महिला कुस्तीगीर शेवटी निराश झाल्या. आज अखिल भारतीय कुस्ती महासंघावर पुन्हा या सिंगचाच वरचष्मा आहे. मणिपूरमध्ये महिलांची नग्न धिंड काढण्यात आली त्याबाबतही भाजपचे नेते एका शब्दाने बोललेले नाहीत. तेव्हा यांची नैतिकता व शुचिता या सर्व दिखाव्याच्या गोष्टी आहेत. राष्ट्रीय स्वयंसेवक संघामध्ये तळाला अनेक जण निष्ठेने व प्रामाणिकपणे काम करतात. धृतराष्ट्र जन्मांध होता. पण या मंडळींना इतके धिंडवड उडूनही बहुदा डोळ्यावर कातडे ओढण्याखेरीज दुसरा पर्याय नाही.

विचार

# प्रादेशिक असमतोल काळजीचा

**संयुक्त महाराष्ट्र दिन साजरा करताना संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये असणारा बेळगाव, कारवारसह मुंबईचा मुद्दा अद्यापही मागे असल्याच्या वास्तवाचे भान ठेवणे गरजेचे आहे. खरे पाहता गेली अनेक वर्षे हा विषय न्यायप्रविष्ट आहे. मात्र कोणताही राजकीय पक्ष तो वेगाने मार्गी लावण्याकडे लक्ष देताना दिसत नाही. दुसरीकडे, आजच्या महाराष्ट्राने वाढत्या प्रादेशिक असमतोलाचे भान राखणेही गरजेचे वाटते.**




डॉ. भालचंद्र कानगो

महाराष्ट्र दिनानिमित्त दरवर्षी राज्यासंबंधीच्या विविध विषयांची चर्चा होते. राज्याशी संबंधित नानाविध बाबींचा विचार होतो. तोच धागा धरत संयुक्त महाराष्ट्र चळवळीकडे बघायचे तर त्यावेळी बेळगाव, कारवारसह मुंबई अशी मागणी राहिली होती; याचे स्मरण करावेसे वाटते. बेळगाव आणि कारवार काही महाराष्ट्रात आले नाही. अलिकडेच आपण आचार्य अत्रे यांची १२५ वी जन्मतिथी साजरी केली. मात्र त्यांनी पाहिलेले हे एक स्वप्न अपूर्ण राहिले, असे आज वाटून जाते. खरे पाहता २००४ पासून सर्वोच्च न्यायालयात यासंबंधीचा प्रश्न प्रलंबित आहे. मात्र २० वर्षे उलटल्यानंतरही त्यावर सुनावणी होत नाही, हे अजबच म्हणावे लागेल. मुख्य म्हणजे ती लवकर व्हावी म्हणून कोणतेही सरकार प्रयत्न करताना दिसत नाही. बीजेपी वा काँग्रेस, कोणीही त्यात पुढाकार घेतल्याचे दिसत नाही. थोडक्यात, 'ठंडा करके खाओ' असेच या दोन्ही राजकीय पक्षांचे या संबंधित धोरण असल्याचे यंदाचा महाराष्ट्र दिन साजरा करताना आपण लक्षात घ्यायला हवे. आज महाराष्ट्राने आग्रह धरलेल्या या दोन्ही भूभागांमध्ये कर्नाटक भाषा सक्तीची आहे. तिथे कन्नडीगांची संख्या वाढत आहे. सीमावाद वाढत असून त्या अनुषंगाने उद्‌भवणाऱ्या समस्याही गंभीर होताना दिसत आहेत. म्हणूनच संयुक्त महाराष्ट्र दिन साजरा करताना हे वास्तव विसरता कामा नये, असे मला वाटते.

सध्या मोदी सरकारने राज्या-राज्यांमध्ये औद्योगिकीकरणाची स्पर्धा सुरू केली आहे. आधीपासूनच ती सुरू होती, पण आता उघडपणे सुरू झाली आहे. त्यामुळेच महाराष्ट्र दिनाचे साजरीकरण करताना आपण या स्पर्धेत पिछाडीवर पडू नये, याची काळजी घेणेही गरजेचे आहे. कारण औद्योगिकीकरण हे पूर्वीपासूनच महाराष्ट्राचे वैशिष्ट्य राहिले आहे. दुसरीकडे, महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाणही प्रचंड आहे. त्यामुळे राज्याच्या भविष्याचा विचार करताना शेतकऱ्यांच्या आत्महत्या कशा थांबवायच्या, यावरही गांभीर्याने चर्चा होणे गरजेचे आहे, कारण ती झाली नाही तर कशाचाही उपयोग होणार नाही. शेवटी कारणे काहीही असली तरी मरणारा शेतकरी मराठीच आहे. त्यामुळे त्याचा विचार न करता महाराष्ट्राचा जयजयकार करण्यात काहीही अर्थ नाही.

सध्या हे राज्य अनेक समस्यांनी ग्रासले आहे. यातील एक समस्या वाढत्या शहरीकरणाची आहे. या वास्तवामुळे अनेक गुंतागुंतीचे प्रश्न निर्माण झाले आहेत. पश्चिम महाराष्ट्रामधील औरंगाबादपासून मराठवाड्याचा भाग बघितला तर तिथे आठ, दहा, पंधरा दिवसांमधून एकदा पाणी मिळते. अर्थात राज्याच्या अन्य भागांमधील स्थितीही फारशी समाधानकारक नाही. पाण्याचे दुर्भिक्ष्य ही महाराष्ट्रापुढील मोठी समस्या आहे. खरे तर संपूर्ण देशातील ५० टक्क्यांपेक्षा जास्त धरणे महाराष्ट्रात बांधली गेली. मात्र असे असूनही इथे १८ टक्क्यांपेक्षा अधिक सिंचन दिसत नाही. कोरडवाहू शेतीचे क्षेत्र मोठे असले तरी तिला पाणी मिळाल्याखेरीज उत्पादकता वाढणार नाही. त्यामुळे पाणीप्रश्नी ठोस उपाययोजना आखून उत्पादकता वाढवणे हे राज्यापुढील प्रमुख ध्येय असणे गरजेचे आहे. शेतमालाला योग्य तो हमीभाव देणे हा राज्यातील चर्चेचा विषय आहे. एका अर्थी हा दुसऱ्या क्रमांकाचा प्रश्न आहे, असेही म्हणता येईल. शेतकरी सन्मानाने जगायला हवा असेल तर आपल्याला या दोन्ही प्रश्नांवरील उत्तरे शोधावी लागतील. खेरीज वाढती बेरोजगारी कमी करण्याकडेही आपल्याला लक्ष पुरवावे लागेल. ही बेरोजगारी दोन प्रकारची आहे. एक म्हणजे नवीन तंत्रज्ञानामध्ये माणसे कमी केली जात आहेत. यंत्रांचा वापर वाढल्यामुळे कमी माणसांच्या आधारे जास्त काम पूर्ण करण्याची पद्धत रुढ होत आहे. रोजगाराच्या संधीच कमी होणे हे रोजगारवाढ कमी होत असल्याचे दुसरे कारण आहे. त्यामुळेच आजच्या महाराष्ट्रात लोक सन्मानपूर्वक नोकऱ्या मिळवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न करताना दिसतात. नोकरीचा प्रश्न सुटला तरी निवृत्तीपश्चातचा कायदेशीर प्रश्नही जटील पातळीवरच आहे. त्यामुळेच आशा कर्मचारी, अंगणवाडी कर्मचारी यांना सातत्याने आंदोलने करावी लागतात. बांधकामांचे प्रश्नही काही कमी नाहीत. एकंदरच हे सगळे नवीन प्रश्न असून ते कसे सोडवायचे याचा विचार महाराष्ट्र दिन साजरा करताना व्हायला हवा.

कामगार कायद्यात सुधारणा करुन फक्त कारखाने कसे बंद करता येतील, कामगारांची संख्या कशी कमी करता येईल आणि आपल्याला पैसे देणाऱ्या मालकांना कशी मदत करता येईल याचाच विचार सरकारने केला. परंतु, असंघटित कामगारांना सुरक्षा देणे, त्यांच्या सुरक्षित भविष्यासाठी काही पावले उचलणे याचा विचारही झाला नाही. म्हणूनच संयुक्त महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने महाराष्ट्र सरकारने या चळवळीतील कामगारांचे योगदान लक्षात घेऊन तरी काही महत्त्वपूर्ण भूमिका घेणे गरजेचे आहे. औद्योगिकीकरणात राज्य पुढे आहे तसे कामगार कल्याणातही असायला हवे.

सध्या प्रादेशिक असमतोल निर्माण झाला आहे. मराठवाडा, विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्र यांच्यात मोठ्या प्रमाणात प्रादेशिक असमतोल निर्माण झाल्याचे बघायला मिळत आहे. आंदोलनांमधून त्याचा परिणाम आपल्याला स्पष्ट दिसतो. महाराष्ट्र दिन साजरा करताना या वास्तवाकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. सरकारने जाती-जातींमध्ये सलोखा कसा राहील हे पाहणे गरजेचे आहे. केवळ मतांसाठी ओबीसी-मराठा भांडणे लावणे वा अन्य गटांमध्ये तेढ निर्माण करण्याचे प्रकार आता तरी बंद व्हायला हवेत, कारण शिवाजी महाराज, शाहू, फुले, आंबेडकर यांच्या परंपरेत हे बसत नाही. एकीकडे महाराष्ट्र आपली तत्त्वे आणि लांगुलचालन न करण्यासाठी ओळखला जात होता. चिंतामणराव देशमुख, अण्णासाहेब कर्वे, आचार्य अत्रे, डांगे असे लांगुलचालन न करणारे नेते आपला आवाज कणखरपणे उचलायचे. हीच त्यांची ओळख होती. पण सध्या विकासाच्या नावाखाली राज्यात दलबदलू आणि संधीसाधू राजकारण सुरू झाले आहे. महाराष्ट्रासाठी ते लांच्छनास्पद आहे. पूर्वीच्या काळी राज्यात असे घडू शकते, असे कोणी सांगितले असते तर खरे वाटले नसते. मात्र आता आपण ते प्रत्यक्ष पहात आहोत, अनुभवत आहोत. म्हणूनच हे चित्रही बदलायला हवे.

स्पर्धात्मक वातावरण विकासाला पोषक असते, यात शंका नाही. मात्र ती चुकीच्या भूमिकेतून वा प्रयत्नांमधून साकारत असेल तर परिस्थिती वेगळी दिसते. महाराष्ट्रातील उद्योग बाहेर जाताना बघताना हा मुद्दा पटल्याखेरीज राहत नाही. जास्त सवलत देतील, स्वस्तात जमीन देतील, वीज देतील आणि कामगार कायदे कमकुवत असणाऱ्या राज्यांमध्ये जाऊन उद्योगपती एक प्रकारे गैरफायदा घेत आहेत. कायद्यांची अंमलबजावणी होत नसणारे भाग त्यांच्यासाठी अधिक योग्य आहेत. गुजरात हे त्याचे एक उत्कृष्ट उदाहरण आहे. मात्र गुजरातमध्ये हे शक्य असण्याचे कारण म्हणजे तिथे मूळ गुजराती कामगार अगदी कमी संख्येने आहेत. तिथे बाहेरुन आलेल्या कामगारांची अधिक संख्या असल्यामुळे सरकारला त्यांची फारशी काळजी नसते. 'नसेल परवडत तर परत जा...' अशी त्यांची भूमिका असते. पण महाराष्ट्रात तशी भूमिका घेऊन चालणार नाही.

राज्यात मालेगाव, भिवंडीसारख्या भागांमध्ये कामगारांकडून बारा बारा तास काम करवून घेत असल्याचे प्रकार उघडकीस येत आहेत. कामगारांना सामाजिक सुरक्षा मिळत नाही. निवृत्तीवेतन मिळत नाही. ही कार्यपद्धती कामगारांचे खच्चीकरण करणारी आहे. खरे तर महाराष्ट्र हा कामगार चळवळीचा महत्त्वाचा अड्डा राहिला आहे. संयुक्त महाराष्ट्र चळवळीमध्ये कामगार चळवळींनी मुंबईसह महाराष्ट्र राज्य स्थापन होण्यामध्ये सिंहाचा वाटा बजावला आहे. त्यामुळेच महाराष्ट्र दिन आणि कामगार दिन साजरा करताना याची आठवण ठेवणे आवश्यक आहे. कामगारांचे कल्याण, त्यांचे हितसंबंध जपणे यास प्राधान्य दिले तर राज्याचा विकासरथ कोणीही रोखू शकणार नाही, असे वाटते.

आजकाल

# रेल्वे प्रवाशांचा वाली कोण?

संजीव चांदोरकर

गेल्या काही वर्षात तुमच्या पैकी किती जणांना स्वतः ला किंवा मित्र/नातेवाईक/ शेजारी यांना हा अनुभव आला आहे.

कि सेकंड क्लास/ नॉन एसी स्लीपर उपलब्ध नाहीये, पण त्याच गाडीत एसी कोच/स्लीपर जागा/ बर्थ उपलब्ध आहेत; म्हणून तुम्हाला खूप जास्त पैसे भरून एसी कोच/स्लीपर घ्यावा लागला? याचे कारण केंद्र सरकारच्या मालकीची भारतीय रेल्वे सेकंड क्लास/नॉन एसी स्लीपर कोच संख्या घटवून एसी कोचेस संख्या वाढवत आहे.

हळहळू वंदे भारत सारख्या महागड्या एसी ट्रेन्सची संख्या वाढवत आहे.

मुद्दा एसी ट्रेन्स असाव्यात का नसाव्यात हा नाही; ट्रोल नेहमीप्रमाणे पोस्टमध्ये त्यांना सोयीस्कर तेथे बोटाने भोक पाडून त्यात नाक खुपसतील त्यांच्याकडे दुर्लक्ष करू या.

मुद्दा नॉन एसी प्रवासी आसन संख्या/गाड्या कमी करून एसी ट्रेन्स वाढवाव्यात का हा आहे!

जे मुद्दा मुंबईच्या लोकल ट्रेन्सच्या बाबतीत लागू होतो; गेली अनेक दशके मुंबईकर किती हाल अपेष्टा सहन करून गर्मी/पावसात प्रवास करतात; त्यांच्या ऑर्डीनरी गाड्यांची संख्या कमी करून एसी ट्रेन्स चालवल्या म्हणून आंदोलने झाली/होत राहतील

कोणाला नाही आवडत एसी मध्ये प्रवास करणे?; मुद्दा एसी चे तिकीट परवडण्याचा आहे.

एका सर्वेप्रमाणे नॉन एसी स्लीपर ३०० रुपये तिकीट



असेल तर एसी स्लीपरचे तिकीट १२०० रुपये आहे; म्हणजे ४ पट आजपर्यंत ५१ वंदे भारत गाड्या ४५ मार्गावर सुरु झाल्या आहेत; आणि येत्या काळात त्यांची संख्या ४०० पर्यंत वाढवली जाणार आहे.

याचे कारण आहे रेल्वेचा आतबट्याचा कारभार खर्च आणि उत्पन्न यांच्या गुणोत्तराला रेल्वेच्या परिभाषेत ऑपरेटिंग रेशो म्हणतात; म्हणजे १०० रुपये कमवण्यासाठी रेल्वेला किती रुपये खर्च करावे लागतात

२०१४ मध्ये १०० रुपये कमवण्यासाठी रेल्वेला ९१ रुपये खर्च करावे लागत होते; २०२३ मध्ये १०७ रुपये खर्च करावे लागत आहेत.

हे आहे कारण नॉन एसी/ सेकंड क्लास वाल्याना त्यांच्या न्याय्य प्रवासाचा हक्क नाकारून, जबरदस्तीने, परवडत नसताना एसीची, चारपट महाग तिकीटे विकत घ्यायला लावण्याचे.

यात फालतू एसी वि नॉन एसी; श्रीमंत विरुद्ध गरीब असला वाद आणू नये.

मुद्दा आहे साधनसामुग्री वाढवायची नाही; अर्थसंकल्पीय तरतुदी वाढवायच्या नाहीत; बुलेट ट्रेन सारख्या फॅन्सी प्रकल्पाना प्राधान्य द्यायचे.

उत्पादकता वाढवायची नाही;

रेल्वेकडे शुद्ध नफा केंद्री दृष्टिकोनातून बघायचे; रेल्वे चालवण्यातून मिळणाऱ्या सोशल रिटर्न्सचे/आणि पर्यावरणीय रिटर्न्सचे रुपयातील लाखो कोटी रुपयांचे मूल्य सार्वजनिक करायचे नाही; ते केले कि रेल्वे वरच्या साऱ्या चर्चा आमूलाग्र बदलतील.

रेल्वे मध्ये मंजूर पदांपैकी ३ लाख पदे रिक्त आहेत; भरती होत नाहीये. आणि गळा काढून रडत राहायचे; तोटा होत आहे म्हणून तोटा कमी करण्याच्या नावाखाली गरिबांच्या फाटक्या खिशात हात घालून घालून अजून पैसे काढायचे;

गरीब स्वखुशीने एसीचे तिकीट काढतील, त्यांची क्रयशक्ती वाढवली तर; गरिबांच्या क्रयशक्ती वाढवण्याचा विषय काढला रे काढला कि सारे सुटेड बुटेड पुस्तकी अर्थतज्ञ पळून जाणे पसंद करता.

एक जण गरीब असेल तर त्याला आळशी म्हणाल; दुसरा गरीब असेल तर त्याला ऐतखाऊ म्हणाल; पण ज्यावेळी लाखो, कोट्यवधी स्त्री पुरुष गरीब आहेत त्यावेळी? ते सर्व आळशी आणि ऐतखाऊ?

त्याचे बिल आर्थिक धोरणकर्त्यांवर आम्ही फेडायचे नाही? ८० कोटी नागरिकांना मोफत धान्य द्यावे लागते यात धोरणकर्त्यांनी लाज बाळगायची की त्याची जाहिरात मिरवायची?

लोकसंसद

## लोकल प्रवाशांच्या दुर्दैवाचे दशावतार

डोंबिवलीला राहणारी रिया राजगोर नावाची २६ वर्षीय तरुणी लोकलमधून प्रवास करताना मध्य रेल्वेच्या कोपर ते दिवा रेल्वे स्थानकांदरम्यान तोल जाऊन खाली पडली व जागेवरच गतप्राण झाली. काही दिवसांपूर्वी २५ वर्षीय अवधेश दुबे नावाचा तरुणही लोकलच्या रेटारेटीत हात सटकल्याने दिवा आणि मुंब्रा स्थानकांदरम्यानच्या मुंब्रा खाडीत पडला आणि प्राणास मुकला. त्यामुळे रेल्वेच्या जीवघेण्या प्रवासाचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. रेल्वे पोलिसांच्या अहवालानुसार २०२३ मध्ये मुंबईच्या उपनगरीय रेल्वे रुळांवर एकूण २५९० लोक मरण पावले म्हणजे दररोज सरासरी सात प्रवाशांनी आपला जीव गमावला. या पैकी १६५० मृत्यू मध्य रेल्वेवर झाले आहेत तर पश्चिम रेल्वेवर ९४० मृत्यूची नोंद झाली आहे. एकूण मृत्यूंपैकी १२७७ लोक अनधिकृतपणे रेल्वे रूळ ओलांडताना आणि ५९० लोक धावत्या ट्रेनमधून पडून मरण पावले. त्यामुळे मुंबई उपनगरीय रेल्वे लोकल आता जीवनवाहिनी न राहता एक प्रकारे 'मरण'वाहिनी झाली आहे. मुंबई उपनगरीय मार्गावर लोकल ट्रेनने दररोज ७५ लाखांहून अधिक प्रवासी प्रवास करत असल्यामुळे रेल्वे प्रशासनही हतबल झाले असून अशा परिस्थितीत लोकल प्रवाशांच्या दुर्दैवाचे दशावतार कधी संपणार हाच खरा प्रश्न आहे.

**- राजेंद्र लकेश्री**, मुंबई

मराठी साहित्यिक दिनविशेष

**दोन मे**

**१८७४ :** कवी, काव्यसमीक्षक, निबंधकार, साक्षेपी संपादक असा नावलौकिक मिळवणाऱ्या बाळकृष्ण अनंत भिडे यांचा जन्म १८७४ साली रायगड जिल्ह्यातील किहीम या गावी झाला. माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षण मुंबईच्या विल्सन कॉलेजातून घेतले. पुढे बी.ए. झाल्यावर मुरुड-जंजिरा येथील शाळेत शिक्षक म्हणून रुजू झाले आणि मुख्याध्यापक म्हणून निवृत्त झाले. लेखनाची आवड त्यांना कॉलेजात असल्यापासून होती. 'करमणूक', 'काव्यरत्नावली' त त्यांच्या कविता प्रसिद्ध झाल्या. काही इंग्रजी कवितांचीही त्यांनी भाषांतरे केली. याशिवाय समीक्षणात्मक व चर्चात्मक निबंधलेखन त्यांनी केले. 'वामनपंडित' या ग्रंथातून त्यांनी या नावाचे पाच वेगवेगळे कवी होऊन गेलेत हे सिद्ध केले. 'प्रभूप्रसादन', फुलांचे झेले' हे काव्यसंग्रह, वामनपंडीत, मुक्तेश्वर, बोवा, आदींवर वृत्त व ग्रंथ हे त्यांचे गाजलेले निबंध पुस्तकरुपाने प्रसिद्ध झाले. ' प्राचीन व अर्वाचीन मराठी कवी', 'मराठी काव्याची उत्क्रांती व केशवसूत', 'काव्यविवेचन', 'ग्रंथपरीक्षण' यावर विस्तृत लेख त्यांनी लिहिले. प्रारंभापासून ते महानुभावापर्यंतच्या वाङ्मयेतिहासाचे विवेचन केलेला 'मराठी भाषेचा व वाङ्मयाचा इतिहास' हा त्यांचा आणखी एक गाजलेला ग्रंथ. त्यांचे बरेच गद्यलेखन 'बी नावाने प्रसिद्ध आहे. 'मराठी कवींचे बोल', 'ज्ञानेश्वरी' या संपादित पुस्तकासंह 'चार वीर मुत्सद्दी' या पुस्तकातून शिवाजी महाराज ऑक्व्हिर क्रॉमवेल, जॉर्ज वॉशिंग्टन, नेपोलियन यांची चरित्रे आहेत. त्यांचे स्पूट लेखनही विपूल आहे. त्यांचे काव्य व काव्योदय', 'श्री तुकाराम चरित्र, 'किरण',' सुधारक', 'आधुनिक कवीपंचक 'विरहतरंग' आदी पुस्तकांवरील त्यांचे परिक्षण लेख गाजले. एक साक्षेपी संपादक असाही नावलौकिक त्यांनी संपादन केला. मोरोपंतकृत महाभारत, मोरोपंतकृत स्फू काव्ये, वामनपंडित चरित्र, हरीविलास, यथार्थदीपिका, सार्थ ज्ञानेश्वरी आ ग्रंथांचे संपादन त्यांनी केले. एक व्यासंगी वाङ्मय विवेचक असा मरा साहित्यात ठसा उमटवणाऱ्या भिडयांचे २ मे १९२९ रोजी निधन झाले. **१९००:-** 'महाराष्ट्राचा इतिहास' (सन १३०० ते १७०७) आणि 'विष्णुशास्त्री चिपळुणकर यांचे चरित्रफ लिहिणारे लक्ष्मण कृष्ण चिपळुणकर यांचे निधन. विष्णुशास्त्रींचे ते धाकटे बंधू. **१९०२:-** हरि नारायण आपटे यांचे चरित्र लिहिणाऱ्या लेखिका निर्मला हर्षे यांचा जन्म. त्यांनी आपले लेखन मात्र कु. वेणुबाई पानसे या माहेरच्या नावाने केले. **१९०४:-** चरित्रलेखक, आत्मचरित्रकार, कादंबरीकार नारायण रामकृष्ण अभ्यंकर यांचा जन्म. महात्मा गांधीजींच्या असहकार चळवळीच्या आंदोलनात ते सहभागी झाले होते. त्या काळावर भेटलेला खरा वारकरी ही त्यांची प्रसिध्द कादंबरी, याशिवाय 'लग्नाचा फास', 'अपराध कुणाचा' या त्यांच्या कादंबऱ्या प्रसिध्द. याखेरीज 'गांधीजींचे चरित्र आणि अंतरीच्या नाना कळा' हे आपले आत्मचरित्र आणि 'अंतरीच्या नाना कळा' हे आपले आत्मचरित्र हे त्यांनी लिहिले आहे. **१९२७:-** विविध नियतकालिकांतून लेखन करणाऱ्या समाज कल्याण समितीच्या जाणकार मंदा यशवंत बोडस यांचा जन्म. ह्यांची चाळीस एक पुस्तके प्रसिध्द झाली असून यामध्ये 'खेड्याचे आरोग्य, 'भारतीय सण व उत्सव' हे नवसाक्षरांसाठी, 'गडबडराव' हा कथासंग्रह शिशुवर्गासाठी तर कुमारांसाठी 'गाणारी मैना', 'जादूचा ढोल', 'सिंहासन बत्तीशी' मिळून १५ हून अधिक पुस्तके. याशिवाय ङ्गगंधवेडीफ हा काव्यसंग्रह, अशी साहित्य संपदा. **१९४१:-** लेखक नाटककार नीलकंठ सावित्री किसन यांचा जन्म. प्रकाशित ग्रंथसंपदेत 'मदिरा मस्तानी' हे दीर्घकाव्य प्रसिध्द. **१९४४:-** लेखक प्रा. डॉ. गणेश उमाकांत थिटे यांचा जन्म. 'चार्वाक समीक्षा', 'यज्ञ', 'आशय आणि आविष्कार', 'महाभारताची पार्वभूमी', 'पचिम अशिया', 'प्राचीन भारतीय गुलामगिरी', 'संस्कृती सुगंध' हे त्यांचे संपादित ग्रंथ त्यांच्या अभ्यासु व्यासंगाची साक्ष देतात. **१९४५:-** भारतीय साहित्यशास्त्राचे अभ्यासक या बिरुदावलीने सन्मानित झालेल्या पद्‌माकर रामचंद्र दाढेगावकर यांचा जन्म. 'शोधयात्रा' या संपादित ग्रंथासह 'रससिध्दांत आणि सिध्दी' व 'रसचर्चा' ही पुस्तके त्यांच्या नावावर आहेत. **१९४८:-** साहित्यिक प्रा. दिलीप गुलाबसिंह परदेशी यांचा जन्म. 'अस्त', 'काळोख देत हुंकार' मिळून दहा नाटके, 'काळी होती नकटी एक', 'मोनॅड' ह्या एकांकिका तसेच तत्कालिन नियतकालिकांतून सातत्याने लेखन. देव आनंद यांच्या 'हम नौजवान' व 'सच्चे का बोलबाला' या चित्रपटांच्या कथा, पटकथा, संवाद त्यांनीच लिहिलेत. **१९६३:-** महाराष्ट्रातील जादूगारांचे गुरू डॉ. के. बी. लेले यांचे निधन. जादूविद्येला वाहिलेले 'गुरुकिल्ली' नावाचे नियतकालिक त्यांनी सुरु केले. **१९७३:-** समीक्षक, विचारवंत दिनकर केशव बेडेकर यांचे निधन. 'जीवन आणि तत्वज्ञान', 'अस्तित्ववादाची ओळख' या तत्वज्ञानात्मक पुस्तकांशिवाय 'संयुक्त महाराष्ट्र', 'भारतीय प्रबोधन' इत्यादी ग्रंथ. **१९७५:-** रसवक्ता, काव्यामता गुणांनी युक्त असा नावलौकिक संपादणारे आणि 'आधी बीज एकले', 'बीज अंकुरले', 'रोप वाढले' हा प्रभातच्या तुकाराम चित्रपटातील अभंग लिहिणारे कवी, गीतकार व पराविद्येचे अभ्यासक शांताराम गोविंद आठवले यांचे निधन. त्यांच्या पद्यरचनेत 'एकले बीज', 'बीजांकूर', 'चंदेरी लहरी', 'सुमन फळे' आदी संग्रह प्रसिध्द. तसेच 'शांताचिया घरी', 'साधा विषय मोठा आशय', 'ओंकार रहस्य', 'ज्ञानदेवीची आराधना' ही त्यांची पुस्तके भारतीय संस्कृतीचा साधा सुंदर भाषेत परिचय करुन देतात. 'प्रभात काळ' हे त्यांचे आत्मकथनपर लेखन. तसेच 'प्रभात काळ' हा प्रभात फिल्म कंपनीत असताना पाहिलेली माणसे आणि चित्रपटांची घडण यांविषयीचा लेखसंग्रह, ही त्यांची ग्रंथसंपदा.

**संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२मे
१) श्रीम. शैलजा पळनीटकर
ब्राह्मणआळी, अलिबाग
०२-०५-१९४०
२) श्री. विवेक वसंत पाटील
नवगाव, अलिबाग
०२-०५-१९६३

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

# समुद्रात डिझेल तस्करीला ऊत

**। उरण । वार्ताहर ।**

महाराष्ट्रातील कोकण किनारपट्टीमध्ये मुंबई, उरण, अलिबाग, रेवस, रेवदंडा, मांडवा, धरमतर खाडी इतर सागरी किनारी डिझेल तस्करी जोरात सुरू असल्याची चर्चा आहे. दरम्यान, स्थानिक प्रशासनकडून कारवाई होत नसल्याने केंद्रीय प्रशासन सक्रिय झाले आहे, असे बोलले जात आहे. त्यानुसार भारतीय तटरक्षक दलाने मुंबई वायव्येला डिझेलच्या कथित तस्करीत सहभागी असलेली मासेमारी बोट व सुमारे ११ लाख ४६ हजार रक्कम जप्त करून पाच खलाशांना अटक केले आहे.



डिझेल तस्करीसाठी जडत वेस्स्ल बाजचा दिशेने दि. १४ एप्रिल रोजी मांडवा बंदरातून निघालेली बोट भारतीय तटरक्षक दलाच्या दोन वेगवान बोट व इंतेरसेप्टर बोटीच्या सहाय्याने आडवली. भारतीय तटरक्षक दलाच्या अधिकाऱ्यांनी केलेल्या तपासात २० हजार लीटर इंधन साठवण्यासाठी रचनेत बदल केलेली बोट, तसेच ही बोट खोट्या वेगवेगळ्या नावाने चालवली असल्याचे आढळून आले. तसेच कागदपत्रांमध्ये अनेक प्रकारच्या विसंगती आढळून आली. यावेळी झडती घेतली असता जडत वेस्स्ल बाजवाल्याना डिझेलच्या बदल्यास देण्यासाठी आणलेली रोख रक्कम ११ लाख ४६ हजार रुपये मिळाले. पुढील तपासीकरिता रोख रक्कम व बोट मुंबई बंदरात आणली असून, बोटीचा मालक कोण?, डिझेल तस्करीचा मुख्य सूत्रधार डिझेलमाफिया कोण?, तसेच कुठल्या जडत वेस्स्ल बाजकडून डिझेल घेणार होते? आदी अधिक तपासाकरिता महसूल गुप्तचर संचालनालय सीमा शुल्क विभाग आणि राज्य पोलीस दल यांचा पुढील तपास चालू आहे. महाराष्ट्र तटरक्षक, कस्टम पोर्ट ट्रस्ट, सागरी पोलीस यांना डिझेल तस्करी करणाऱ्यांची माहिती असताना कठोर कारवाई न केल्याने ते रेकॉर्डवरचे गुन्हेगार मोकाट आहेत. त्यामुळे अरबी समुद्रात डिझेल तस्कऱ्यांचा प्रभाव वाढला आहे, अशी चर्चा आहे.

# नवदाम्पत्यासाठी ‘युगल सुरक्षा’

**। सारळ । प्रतिनिधी ।**

सध्या लग्नाचा हंगाम सुरु आहे. त्यानिमिताने नवविवाहित दाम्पत्याला जवळचे लोक वेगवेगळ्या वस्तू भेट देत असतात. काहीवेळेला या वस्तू त्यांच्याकडे अगोदरच असतात, त्यामुळे दांपत्याच्या दृष्टीने निरुपयोगी ठरतात. अशावेळी त्यांना काय भेट द्यावी, हा प्रश्न त्यांच्या नातेवाईकांना, मित्रांना पडू शकतो. यावर रायगड डाक विभागाने ‘युगल सुरक्षा’ पॉलिसी सुरू करुन नवदाम्पत्याला अनोखी भेट दिली आहे.



आंबेपूर रायगड डाक विभागात कार्यरत असणाऱ्या मयूर भोईलकर या कर्मचाऱ्याच्या लग्नानिमित्त त्याच्या सहकाऱ्यांनी लग्नाच्या दिवशी भारतीय डाक विभागाच्या युगल सुरक्षा नावाची विमा पॉलिसी काढून त्याचे विमापत्र लग्नात भेट म्हणून देऊन त्यांचे लग्न स्मरणीय केले.

सर्वसामन्य जनतेसाठी असणाऱ्या या योजनेची माहिती लोकांना मिळावी, असा उद्देश यापाठीमागे रायगड विभागाकडून साध्य केला गेला. सहकाऱ्यांनी विवाहितांसाठी डाक विभागाकडे असणाऱ्या ही खास विमा पॉलिसी त्यांच्या लग्नात भेट देऊन एक नवीन पायंडा पाडला. याप्रसंगी रायगड डाक अधीक्षक सुनील थळकर, सहाय्यक अधीक्षक सुनील पवार, पोस्टमास्टर गजेंद्र भुसाणे, संतोष चिपळूणकर हजर होते.

# ‘गाव कजा परक्यांची मजा’ नाटकाचे सादरीकरण



**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील रांजणपाडा येथील गावदेवी मरूआईच्या यात्रेनिमित्त आणि स्वर्गीय बाबीबाई त्रिंबक पाटील यांच्या स्मरणार्थ अष्टगंध कला मंच उरण-नवी मुंबईच्या वतीने दि. २९ एप्रिल रोजी ‘गाव कजा परक्यांची मजा’ हा आगरी बोली भाषेतील नाट्यप्रयोग रांजणपाडा येथील हनुमान मंदिराच्या प्रांगणात रात्री ९.३० वाजता सादर करण्यात आला. या नाट्यप्रयोगाला ग्रामीण रसिक प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद लाभला.

या नाटकाचे लेखन व दिग्दर्शन नाटककार हासूराम पाटील यांनी केले आहे. तर, सहदिग्दर्शन चेतन पाटील यांनी केले आहे. नाटकात हासूराम पाटील, दिगंबर कोळी, प्रसाद कडू, रोशन घरत, नवनीत माळी, कृष्णकांत म्हात्रे, चेतन पाटील, अशोक म्हात्रे, जयकिसन मोकल, बाळ, दत्तात्रेय घरत, रमेश कोळी, वैशाली मोहिते, परिशा सरोदे, रुचिता म्हात्रे आणि प्रफुल्ल आदी कलाकारांनी आपल्या अभिनयातून भूमिका साकारल्या. या नाटकाला आनंद कुबल यांचे संगीत लाभले होते. तर नेपथ्य राजा जोशी, रंगभूषा अमृत म्हात्रे, ध्वनी रामचंद्र पाटील, हरेश पाटील, रंगमंच व्यवस्था संतोष साऊंड सर्विस यांची आहे.

ग्रामस्थ मंडळ रांजणपाडा, ड्रीम फाऊंडेशन, स्वराज मित्र मंडळ, जय हनुमान क्रिकेट क्लब या सर्वांचे सौजन्य लाभले. या नाट्य प्रयोगाच्या उद्घाटनप्रसंगी राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, नाट्य, धार्मिक अशा विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर मंडळींनी हजेरी लावली होती. याप्रसंगी उपस्थित मान्यवरांचे स्वागत स्वागताध्यक्ष तथा अष्टगंध कला मंचाचे अध्यक्ष अशोक म्हात्रे, सचिव दत्तात्रेय घरत, मार्गदर्शक हासूराम पाटील, नाटककार धनेश्वर म्हात्रे यांनी केले.

# उद्योजक नितीन बामगुडे पुरस्कार जाहीर

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव येथील तरुण उद्योजक तथा नगरपंचायतीचे माजी नगरसेवक नितीन विष्णू बामगुडे यांना आविष्कार फाऊंडेशन महाराष्ट्र राज्य रायगड जिल्हा शाखेच्या वतीने राज्यस्तरीय महाराष्ट्र रत्न गौरव पुरस्कार २०२४ जाहीर झाला असल्याची माहिती निवड पत्र पाठवून फाऊंडेशनचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष पत्रकार संजय पवार व रायगड जिल्हाध्यक्ष शंकर शिंदे यांनी दिली.



या पुरस्काराचे वितरण रविवार, दि. १२ मे रोजी सकाळी ११ वा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन, बाजीप्रभू देशपांडे चौक, पन्हाळगड, जि. कोल्हापूर याठिकाणी मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार असल्याची माहिती संस्थेतर्फे देण्यात आली आहे. नितीन बामगुडे यांना महाराष्ट्ररत्न गौरव पुरस्कार जाहीर झाल्याने त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

# नेत्रतपासणी शिबीर उत्साहात

**। मुरूड जंजिरा । वार्ताहर ।**

ग्रामस्थ मंडळ नांदगाव, लायन्स क्लब मुरुड, अंश फाऊंडेशन मुंबई व समता फाऊंडेशन मुंबई यांच्या सहकार्याने नांदगावमध्ये झालेल्या मोफत नेत्रतपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरात पन्नास जणांची नेत्रतपासणी करण्यात आली, तर पंधरा जणांवर मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे.



श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालय यशवंतनगर विद्यालयात सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत झालेल्या या शिबिरात यशवंतनगर पंचक्रोशीतील पन्नास जणांची तपासणी डॉ. आशिष पारधी, डॉ. हर्षद गोरे यांनी रुग्णांची तपासणी केली, तर श्रावणी मसुरकर, पॅथॅलॉजिस्ट प्रचिती केणी. सुजित पाटील आदींनी मोठे सहकार्य केले.

लायन्स हेल्थ फाऊंडेशनच्या सीईओ शुभदा कुडतरकर यांच्या मार्गदर्शनाखाली लायन्स क्लब मुरुडचे अध्यक्ष मकरंद कर्णिक, उपाध्यक्ष सनी सोगावकर, नयन कर्णिक, नैनिताल कर्णिक, ॲड. आशिष देशपांडे, विशाल उमरोटकर, सुरेश मालवणकर, दिपेश मोदी, नरेश कुबल, विकास देशपांडे आदींनी या शिबिरासाठी मेहनत घेतली.

# चौलमळा येथे आज आई कृष्णादेवीचा उत्सव

## विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

## मनोरंजनासाठी मुंबई येथील आनंदयात्री ऑर्केस्ट्रा

**। चौल । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील चौलमळा गावची ग्रामदेवता आई कृष्णादेवीचा उत्सव सोहळा गुरुवार, दि. २ मे रोजी आयोजित करण्यात आला आहे. त्यानिमित्त दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती गावचे प्रमुख रवींद्र घरत आणि युवक मंडळ अध्यक्ष महेंद्र नाईक यांनी दिली.



दरवर्षीप्रमाणे यंदाही चौलमळा गावची ग्रामदेवता आई कृष्णादेवीचा उत्सव सोहळा पार पडणार आहे. त्यानिमित्त गुरुवारी सकाळी आठ वाजता मुधकर नाईक यांच्या घरापासून देवीच्या मुखवट्याची सवाद्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. त्यानंतर कृष्णादेवीच्या मंदिरात श्री सत्यनारायणाची महापूजा आयोजित करण्यात आली आहे. यावेळी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून, भाविकांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहनही करण्यात आले आहे. सायंकाळी सात वाजता चौलमळा कृष्णादेवी प्रासादिक मंडळाचे भजन होणार आहे. यावेही बुवा चंद्रकांत नवगावकर यांना विकास पाटील आणि अजय वाडकर पखवाजाची साथसंगत करणार आहेत, अशी माहिती भजन मंडळाचे अध्यक्ष अल्पेश म्हात्रे यांनी दिली. तसेच पंचक्रोशितील ग्रामस्थांच्या मनोरंजनार्थ मुंबई-मुलुंड येथील स्वरश्री प्रतिष्ठान प्रस्तुत आनंदायात्री हा मराठी, हिंदी गाण्यांसह नृत्याविष्काराचा कार्यक्रम होणार आहे.

दरम्यान, मानव सेवा हीच ईश्वरसेवा मानून अंध, अपंग, मतिमंद, मूकबधीर, ज्येष्ठ नागरिक, दुर्बलघटकआणिकर्करोगपीडितांच्या आर्थिक व शैक्षणिक मदतीसाठी आणि त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून एक सामाजिक बांधिलकी जपण्याचे कार्य या कार्यक्रमाच्या माध्यमातून होणार असल्याचे युवक मंडळाचे अध्यक्ष महेंद्र नाईक यांनी सांगितले. विशेष म्हणजे, या कार्यक्रमाचे सादरीकरण करणारे बहुतांश कलाकार दिव्यांग आहेत. स्वरश्री प्रतिष्ठानच्या अध्यक्ष श्रद्धा देसाई (९८७०११२४३७) आणि सचिव प्रमोद कांबळी (९२२०७७१२६७) यांचे पाठबळ या सर्व कलाकारांना मिळत आहे.

सध्या या कार्यक्रमाची जोरदार तयारी सुरू असून, कार्यक्रम यशस्वी व्हावा यासाठी ग्रामस्थ, युवक मंडळातील सदस्य त्यासाठी मेहनत घेत आहेत. तरी, मोठ्या संख्येने भाविक भक्तांनी या कार्यक्रमांना उपस्थित राहावे, असे आवाहन गावप्रमुख रवींद्र घरत, उपप्रमुख जितेंद्र पाटील, युवक मंडळ अध्यक्ष महेंद्र नाईक, भजन मंडळ अध्यक्ष अल्पेश म्हात्रे, उपाध्यक्ष अंजेश घरत यांनी केले आहे.

पान १ वरुन

## तटकरे नव्हे, ‘कट’करे!

जायचे होते. आज ज्यांनी पक्ष उभा केला, त्यांच्याविरूद्ध न्यायालयात चुकीचे भाष्य सुनील तटकरे करतात. पहिल्यांदा यांची मुलगी निवडून आली आणि पवार साहेबांनी तिला मंत्री केली. तरी पवार साहेबांनी काय केलं, असा प्रश्न विचारत असतील तर यापेक्षा दुर्दैव ते काय, असा टोलादेखील आव्हाडांनी लगावला.

सुनील तटकरे हे जेएसडब्ल्यूचे बाप आहेत. जेएसडब्ल्यूमधून यांना सतत रसद पुरविली जाते. मग प्रदूषण कितीही झाले तरी यांना काही फरक पडत नाही. पुढे जितेंद्र आव्हाड यांनी बाळगंगा प्रकल्पामध्ये तटरकेंनी कसा मलिदा खाल्ला याबाबतदेखील भाष्य केले. बाळगंगेची चौकशी होऊ नये म्हणून हे भाजपामध्ये जाऊन बसले आहेत. एवढे वर्ष मंत्री असून तुम्ही रायगडासाठी काय केलंत, हे एकदा तरी जनतेला समजू द्या. तटकरेंनी स्वतःचा आणि स्वतःच्या मुलांशिवाय इतर कोणाचाही विचार केला नाही. पवारसाहेबांसारख्या बाप माणसाला यातना देणाऱ्या तटकरेंना नियती कधीच माफ करणार नाही. मी शेवटी एवढेच सांगेन की, या रायगडच्या मातीत तटकरेंना गाडल्याशिवाय रायगडचा विकास नाही.

**आमची निष्ठा रायगडाशी : शेख सुभान अली**

शेख सुभान अली हे हिंगोलीवरून खास करून अनंत गीते यांच्या प्रचारासाठी आले होते. हे अल्पसंख्याक असून, स्वतःची छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रती असलेली श्रद्धा आणि रायगडाप्रती असलेले प्रेम त्यामुळे ते आज पेणमध्ये महायुतीविरूद्ध बोलत होते. त्यांनी भरसभेत सांगितले की, मी एक छत्रपती शिवाजी महाराजांचा मुस्लीम मावळा आहे. आमची निष्ठा ही रायगडाशी आहे. आज रायगडची शेती विकू पाहणाऱ्या या दलालांचे मनसुबे आम्ही कधीच पूर्ण करू देणार नाहीत. रायगडच्या माती-मातीत शेतकऱ्यांच्या राजाची श्रद्धा आहे. ज्या राजाने शेतकऱ्यांच्या भाजीच्या देठालाही हात लावू नये अशी सक्त ताकीद दिलेली, त्या राजाच्या राजधानीत आज आपल्याला निष्कलंक अनंत गीते यांना निवडून द्यायचे आहे, असे आवाहन केले.

**आमची लढाई हुकूमशाहीविरूद्ध : उल्का महाजन**

आम्ही कुणा राजकीय पक्षाला मानत नाहीत. आम्ही संविधानाला मानतो. या देशाचे संविधान आज धोक्यात आहे, ते वाचविण्यासाठी आम्ही वाड्या-वस्त्यांवर फिरत आहोत. ‘अबकी बार ४०० पार’ हा नारा संविधान बदलण्यासाठीच आहे. त्यामुळे आमची लढाई या मोदी-शहा या हुकूमशाहीविरूद्ध आहे.

## गीतेंसाठी रायगडकर रस्त्यावर

**विचारणे गरजेचे आहे. सार्वजनिक जीवनात काम करत असताना आपल्या उत्पन्नाचा स्त्रोत सर्वांना माहीत असणे गरजेचे आहे. मी माझ्या उत्पन्नाचा स्त्रोत जाहीरपणे सांगतो. असे सुनील तटकरे सांगू शकत नाहीत. मी सरकारचा आजतागायत आमदारकीचा एक रुपया पगारही घेतलेला नाही. मी माझ्या उत्पन्नातील २५ टक्के उत्पन्न गोरगरीब मुलांच्या शिक्षणासाठी वापरतो. पूर्ण देशात १७० च्या वर सीट मोदींच्या येणार नाहीत, असे मी ठामपणे इथे सांगतो आणि यापुढे तटकरे रायगडमध्ये दिसणार नाहीत, हेही सांगतो.**

## ‘गीतेंना मतांची आघाडी मिळणार’

शेकाप कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आ. जयंत पाटील पुढे म्हणाले की, देशात मोदी विरोधात लाट असून, इंडिया आघाडीला सर्वत्र उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळत आहे. मुस्लिम व दलित समाज मोदींच्या विरोधात असून, हे समाज इंडिया आघाडीबरोबर आहेत. त्यामुळे रायगड लोकसभेतील आपल्या इंडिया आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांना प्रचंड मताधिक्य मिळणार असून, श्रीवर्धन मतदारसंघातून प्रचंड मतांची आघाडी गीतेंना मिळणार आहे. या निवडणुकीनंतर तटकरे पुन्हा उभा राहू शकणार नाहीत. ही निवडणूक आपली समजून इंडिया आघाडीचे सर्व कार्यकर्ते कामाला लागले आहेत. शेकापने माणगावात अनेकांना मोठे केले; पण जे कोणी पक्ष सोडून गेले, त्यांचा काहीही परिणाम पक्षावर झाला नाही. आजही शेकापच्या सभांना जिल्ह्यात चांगला प्रतिसाद मिळत आहे. लवकरच माणगाव तालुका चिटणीसची आपण नियुक्ती करू असे सांगत अनंत गीते यांना निवडून आणण्यासाठी कार्यकर्त्यांनी कामाला लागा, असे आवाहन आ. पाटील यांनी केले.

## गुंडगेवासियांचा निवडणुकीवर बहिष्कार

असे समिती अध्यक्ष महेंद्र कानिटकर यांनी जाहीर केले आहे.

कर्जत नगरपरिषद हद्दीत गुंडगे गावाच्या हद्दीत पालिकेचा घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प आहे. या प्रकल्पातून दुर्गंधी पसरत असून, सायंकाळपासून रात्रभर वाऱ्यासोबत येणाऱ्या कोंदट वासामुळे गुंडगे गांव, पंचशिल नगर, संत रोहिदास नगर, परिसरातील रहिवाशी यांना श्वसनाचे आजार जडले आहेत. त्यामुळे हा प्रकल्प हटविण्यात यावा, अशी मागणी सातत्याने केली जात आहे. मात्र, नगरपरिषदेकडून कोणत्याही प्रकारचे कार्यवाही केली जात नाही आणि त्यामुळे घनकचरा प्रकल्प हटाव संघर्ष समितीच्या माध्यमातून रायगड जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले आहे. गेल्या अनेक वर्षापासून आमच्या गुंडगे गावालगत असलेल्या डम्पिंग ग्राऊंडचा त्रास होत आहे. दुसरीकडे परिसरात रोगराई पसरली आहे, अनेकांना श्वसनाचे त्रास होवू लागले आहेत. त्याचवेळी प्रकल्प मधील वेगवेगळ्या उपक्रम यातून निघणारे केमिकलयुक्त पाणी यामुळे शेतकऱ्यांच्या जमिनी नापिक झाल्या आहेत, तसेच या दुर्गंधीमुळे परिसरातील विकास खुंटला आहे. तरीही कर्जत नगरपरिषदेला जाग येत नाही. परिसरातील डम्पिंग ग्राऊंड पर्यायी जागेवर हालवण्यात यावे, याकरिता आम्ही कर्जत नगरपरिषदेवर आक्रोश मोर्चा काढला होता. तसेच आम्ही कर्जत नगरपरिषदेबरोबर सतत पत्रव्यवहारदेखील केला आहे. सदरचे प्रकरण गंभीर स्वरुपाचे असल्याने गुंडगे गाव तसेच परिसरातील नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. गुंडगे गाव तसेच परिसरातील नागरिकांनी आगामी होणाऱ्या लोकसभेच्या निवडणूक प्रक्रियेवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे. १३ मे रोजी होणाऱ्या मावळ लोकसभा मतदारसंघातही मतदान होत असून, गुंडगे गाव तसेच परिसरातील नागरिक मतदान करणार नाही. या सर्व प्रक्रियेला कर्जत नगर परिषद प्रशासन जबाबदार राहणार आहे.

त्याचवेळी समितीच्या वतीने गुंडगे येथील सर्व्हे नं. ६० मधील शासकीय जागेतील डम्पिंग ग्राऊंड हटविण्यात यावे. डम्पिंग ग्राऊंडमधून दररोज दुर्गंधी सुटत आहे. ती तात्काळ थांबविण्याची व्यवस्था करावी. डम्पिंग ग्राऊंडमुळे या परिसरात मच्छरांचे प्रमाण खूप वाढले असून, तात्काळ उपयोजना करावी.डम्पिंग ग्राऊंडच्या शेजारी नव्याने सुरु असलेला स्नेक पार्क आणि सायन्स पार्क या प्रकल्पासाठी कोट्यवधीचा निधी मंजूर झाला आहे. मात्र, आमच्या परिसरातील रस्ते, गटारे तसेच इतर सुविधांसाठी आपल्याकडे फंड उपलब्ध नाही. म्हणून हा प्रकल्प स्थानिकांच्या हिताचा नसून, हा प्रकल्प ताबडतोब बंद करण्यात यावा. डम्पिंग ग्राऊंडच्या परिसरात कर्जत शहरातील बायोगॅससारखा प्रकल्प आणू नये. डम्पिंग ग्राऊंडमुळे शेतकऱ्यांच्या शेतजमिनीचे नुकसान झाले आहे. त्याचा मोबदला शेतकऱ्यांना देण्यात यावा आणि कर्जत शहरातील मोकाट कुत्र्याचे लसीकरण सेंटर आमच्या परिसरात आणू नये या मागण्या करण्यात आल्या आहेत.

## वरंध घाट आठ दिवसांकरिता खुला

वरंध घाटातून प्रवास करावा लागतो. महाड-वरंध घाट भोरमार्गे पुणे हा सुमारे १२० किलोमीटरचा रस्ता असून, पुणे येथे जाण्यासाठी हा सर्वांत जुना व जवळचा मार्ग आहे. हा रस्ता राष्ट्रीय महामार्गाकडे वर्ग करण्यात आल्यामुळे या रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम सध्या सुरू आहे. त्यामुळे हा रस्ता ३० मेपर्यंत वाहतुकीसाठी बंद करण्यात आलेला होता. महाड-दापोली मंडळ रस्ता सोयीचा पडत असेल; परंतु रस्ता बंद झाल्याने प्रवाशांची मोठी गैरसोय होत होती. सध्या पारमाची वाडीजवळ संरक्षक भिंती व रुंदीकरणाचे काम केले जात आहे. या ठिकाणी रस्ता अरुंद असल्याने वाहतूक सुरू ठेवून हे काम करणे कठीण असल्याने येथील वाहतूक बंद करण्याबाबत राष्ट्रीय महामार्ग विभागाने जिल्हा प्रशासनाला कळविले होते.

## धान्य वितरणात येणार गतिमानता

या अडचणीवर मात करण्यासाठी पुरवठा विभागाने दुरुस्ती करून पुन्हा त्या मशीन चालविण्यास सांगितल्या. मात्र, या मशीनचा बिघाड काही संपेना, अशी परिस्थिती निर्माण झाली. नवीन मशीन देण्याची मागणी दुकानदारांनी केली. त्यांच्या मागणीची दखल घेत फोरजी ई-पॉस मशीन देण्यास सुरुवात केली.

जिल्ह्यात सुमारे एक हजार ३०० दुकानदारांना मशीन देण्यात आली. या मशीनद्वारे आता धान्य वितरण करण्याची व्यवस्था करण्यात आली असल्याची माहिती पुरवठा विभागाकडून देण्यात आली. ही मशीन अगोदरच्या मशीनपेक्षा मोठी असून, त्यामध्ये थंब आणि आय स्कॅन पद्धतदेखील असल्याची माहिती समोर येत आहे.

**ग्राहकांना ताटकळत राहावे लागणार नाही**

या मशीनमुळे स्वस्त धान्य वितरण करताना येणाऱ्या अडचणींवर मात करता येणे शक्य होणार आहे. ग्राहकांची होणारी धान्य घेण्यासाठी गर्दी आणि लांबच लांब रांग आता काही अंशी कमी हाणार आहे.

## सुनील तटकरे दगाबाज

माजी नगराध्यक्षा शिवानी जंगम, जयंत पाठक, शांताराम पाटील, संतोष पाटील, खालापूर शहर चिटणीस आकेश जोशी, नरेंद्र शहा यांच्यासह खोपोली शहर तसेच खालापूर नगरपंचायतीतील प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

आ. पाटील पुढे म्हणाले की, शेतकरी कामगार पक्ष विचारधारेवर आधारित पक्ष आहे. इतकेच नव्हे, तर पक्षाला ७५ वर्षांची परंपरा आहे. तो पक्ष तटकरेंच्या सांगण्याने संपणार नाही. आजवर अनेक नेते पक्षात आले, मोठे झाले आणि निघून गेले. मात्र, पक्ष संपलेला नाही. सत्ता येते-जाते, पण कधी विचार संपत नसतात. खुद्द तटकरे यांचे वडीलदेखील शेकापमध्ये होते, याचा त्यांना विसर पडलाय, असा खोचक टोलादेखील आ. पाटील यांनी लगावला.

जर शेकापक्ष संपला असं वाटत असेल, तर तुम्हाला आमची चिंता कशाला भेडसावते आहे, असा मार्मिक टोला जयंत पाटील यांनी लगावला. मागच्या निवडणुकीत शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या जीवावरच तटकरे खासदार झाले.

मात्र, त्याच कार्यकर्त्यांनी त्यांना हरविण्याचा निर्धार केला असल्याचे सांगत शेकाप रायगडातून हद्दपार करणार असे म्हणणारे तटकरेच राजकारणातून हद्दपार होणार, असे सूतोवाच त्यांनी केले. रायगड आणि मावळ या दोन्ही लोकसभा मतदारसंघात इंडिया आघाडीचा प्रत्येक घटक मोठ्या जोमाने कामाला लागला असून, शेतकरी कामगार पक्षाचा कार्यकर्ता तन-मन-धन अर्पण करुन हिरीरीने प्रचारात भाग घेत असल्याचे त्यांनी सांगितले.

## जाहीर नोटीस

श्री.सुनील रामराव पारसकर, यांनी दिलेल्या माहितीवरून, दाखविलेल्या कागदपत्रावरून, आणि त्यांनी दिलेल्या लेखी ना हरकती वरून सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की,-

खालील नमूद मिळकत हि १.श्री. सुनील रामराव पारसकर वय ६७, रा. फ्लॅट नंबर २७०१, २७ वा मजला, बी विंग, आर.ए. रेसिडेन्सी, बी.ए.रोड, माटुंगा मुंबई-४०००१९ आणि २. निरज नाथ वय ५३, रा. प्लॉट नं. १५६, वदाम मार्ग रॉक गार्डन समोर, सेक्टर २१ नेरुळ नवी मुंबई, पिनकोड - ४००७०६ या दोघांनी श्री. अभिषेक मदन जिंदल यांचेकडून साठेखत नंबर २१२०/२०२३ दिनांक १९/०४/२०२३ अन्वये आणि IRREVOCABLE GENERAL POWER ATTORNEY, DOCUMENT NO.२१२१/२०२३ अशा दस्ताने खरेदी केलेली आहे. व सध्यास्थितीत ही मिळकत श्री. सुनील रामराव पारसकर आणि २. निरज नाथ यांचे ताबेकब्जा वहिवाटीत आहे. त्यांची नावे ७/१२ सदरी लागणेसंबंधी प्रोसेस चालू आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**-: मिळकतीचे वर्णन :-**

**मौजे - पाचखडकवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत**

| सर्व्हे नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु .पै. |
|---|---|---|
| २१/१ | १.४६.७० या एकूण क्षेत्रापैकी ०.२५.०० आकार ०.९४ इतके क्षेत्र | १.९४ |

सदरील सुनील रामराव पारसकर आणि निरज नाथ यांनी वर नमूद वर्णनाचे मिळकती मधील नमूद क्षेत्र, आमचे अशील श्री. धरमराज सुखराम मौर्या, ११/८३, एम. एच. बी. कॉलनी नियर मालवणी, नं-८, डेपो मालवणी मालाड वेस्ट मुंबई -४०००९५ यांना विक्री करण्याचे मान्य व कबूल केलेले न-८,आहे.

त्यामुळे वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत, इतर दुसरे कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून, ७ (सात) दिवसांचे आत, खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास, आमचे अशिल सदर मिळकत विकत घेण्याचा व्यवहार, खरेदीखत करुन पूर्ण करतील. तसेच मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कळावे

कर्जत दि. ०२/०५/२०२४

**ॲड. संदिप मारूती घरत**
ऑफिस :-श्री.साईसावली.सो.लि. दुसरा मजला, फ्लॅट नं. १०,कर्जत दिवाणी कोर्टासमोर, ता. कर्जत, जि. रायगड, पिन-४१०२०१.
मो. ९२२०६५३३०२/८४४६७२४९८८





## शासकीय कार्यालयात ध्वजवंदनाचा कार्यक्रम

## सामाजिक उपक्रमातून महाराष्ट्र दिनाचे महत्व

# जिल्ह्यात महाराष्ट्र दिन उत्साहात

**। अलिबाग । प्रतिनिधी । रायगड जिल्हयामध्ये बुधवारी (दि.१) ठिकठिकाणी महाराष्ट्र दिन साजरा करण्यात आला. अलिबागमधील पोलीस मुख्यालयातील कवायत मैदानात मुख्य शासकिय ध्वजारोहणाचा कार्यक्रम मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला. यावेळी पोलीस संचलन, विविध सांस्कृतिक कार्यक्रमातून महाराष्ट्र दिनाचे महत्व पटवून देण्यात आले. रायगड जिल्हा पोलीस सशस्त्र बल, दंगल नियंत्रण पथक, सशस्त्र महिला पोलीस दल, महाराष्ट्र अग्निशमन सेवा, वाहतूक पोलीस दल, पोलीस ब्रास बॅण्ड पथक, होमगार्ड पथक, श्वान पथक, वज्र वाहन, फॉरेन्सिक वाहन, बॉम्ब शोधक व नाशक पथकांनी तसेच जिल्हा सामान्य रुग्णालय १०८ रुग्णवाहिका आदींनी संचलनात सहभाग घेतला. या संचालनाचे नेतृत्व कवायत कमांडर उपविभागीय अधिकारी शैलेश काळे, शिघ्र कृती दलाचे उपनिरीक्षक, शिवराज खराडे यांनी केले. यावेळी जिल्हाधिकारी किशन जावळे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी भरत बास्टेवाड, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे,अप्पर जिल्हाधिकारी सुनील थोरवे यांसह विविध विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.**



● कोरोना काळात तसेच दुर्गम ग्रामीण भागात अखंडित वैद्यकीय सेवा बजावणाऱ्या आशा सेविका वैदेही मोहितला महाराष्ट्र दिनानिमित्त ध्वजारोहणाचा सन्मान देवून त्यांच्या कार्याचा आगळा वेगळा सन्मान श्रीवर्धन तालुक्यातील आरावी ग्रामपंचायतीच्या सरपंच अमोल पुसाळकर यांनी केला आहे.




● जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते ध्वजारोहण



● रायगड जिल्हा परिषदेत मुख्य कार्यकारी अधिकारी भरत बास्टेवाड यांच्या हस्ते ध्वजारोहण



या मुख्य कार्यक्रमाच्या अगोदर अलिबागमधील जिल्हाधिकारी कार्यालयात ध्वजारोहणाचा कार्यक्रम पार पडला. महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या ६५ व्या दिनानिमित्त जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी अपर जिल्हाधिकारी सुनील थोरवे, डॉ. ज्योस्त्ना पडियार, उपजिल्हाधिकारी भारत वाघमारे, उपजिल्हाधिकारी डॉ. रविंद्र शेळके, जिल्हा पुरवठा अधिकारी सर्जेराव सोनवणे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी स्नेहा उबाळे, जिल्हा नियोजन अधिकारी जयसिंग मेहत्रे, तहसिलदार उमाकांत कडनोर, संजय गांधी विभागाचे यादव, अलिबागचे तहसीलदार विक्रम पाटील आदींसह वेगवेगळ्या विभागातील अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. त्यानंतर रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी भरत बास्टेवाड यांच्या हस्ते जिल्हा परिषद कार्यालयासमोर पटांगणात ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र भालेराव, समाजकल्याण अधिकारी डॉ. शाम कदम आदी विविध खात्यातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. जिल्हा रुग्णालयाच्या आवारात जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अंबादास देवमाने यांच्या हस्ते ध्वजारोहणाचा कार्यक्रम पार पडला. यावेळी जिल्हा रुग्णालयातील वैदयकिय अधिकारी, कर्मचारी, परिचारीका उपस्थित होते.

जिल्ह्यातील पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपरिषद शाळा, ग्रामपंचायतीमध्ये महाराष्ट्र दिन मोठया उत्साहात साजरा करण्यात आला.

## कर्तृत्ववान पोलिसांचा सन्मान

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

पोलीस दलात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या रायगड जिल्ह्यातील १९ पोलीसांचा बुधवारी (दि.१) महाराष्ट्र दिनाच्या दिवशी मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मान करण्यात आला. अलिबागमधील पोलीस अधीक्षक कार्यालयात तीन पोलीस अधिकारी व १६ पोलीस अंमलदारांना पोलीस महासंचालक पदकाने कर्तृत्वान पोलिसांचा सन्मान करण्यात आला.

रायगड पोलीस दलातील एक पोलीस निरीक्षक, एक सहाय्यक पोलीस निरीक्षक, एक पोलीस उपनिरीक्षक, सहा सहाय्यक फौजदार, नऊ पोलीस हवालदार व एक पोलीस नाईक यांचा समावेश आहे.

सेवा कार्यात चांगली कामगिरी केल्याने जिल्ह्यातील पोलीस निरीक्षक राजेंद्र मायने, सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ लांडे, श्रेणी पोलीस उपनिरीक्षक विजय टेमघरे, सहाय्यक फौजदार प्रकाश अंबिवले, दिपक ठाकूर, शामकांत पाटील, सुभाष सोनावणे, अनिल सानप, शरद मोरे, पोलीस हवालदार, शशीकांत कासार, प्रदिप झेमसे, राजेंद्र पाटील, यशवंत झेमसे, जगदिश बारे, भानुदास कराळे, वैभव काठे, महिला





### १९ जणांना पोलीस महासंचालक पदक बहाल

पोलीस हवालदार उज्वला ठाकूर, जयेश पाटील, पोलीस नाईक जयेंद्र पाटील यांना पोलीस महासंचालक पदक देऊन गौरविण्यात आले.

यातील सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ लांडे हे सध्या मांडवा सागरी पोलीस ठाण्यात कार्यरत आहे. सहाय्यक फौजदार अनिल सानप हे सध्या अलिबागमधील उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयात कार्यरत आहेत. त्यांनी यापुर्वी अलिबाग पोलीस ठाणे व स्थानिक गुन्हे अन्वेषण अशा अनेक ठिकाणी काम केले आहे. स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेमध्ये असताना त्यांनी सापाच्या विषाची तस्करी करणाऱ्याला पकडण्यामध्ये योगदान दिले आहे.



● मुरुड-जंजिरा नगरपरिषद कार्यालयातील प्रांगणात प्रशासक तथा मुख्याधिकारी-पंकज भुसे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन करुन ध्वजारोहण करण्यात आले. तसेच, मुरुड तहसिलदार कार्यालयातील प्रांगणात तहसिलदार रोहन शिंदे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.



● महाराष्ट्र दिनानिमित्त कोकणविभागाचे मुख्य ध्वजारोहण कोकण विभागीय महसूल आयुक्त पी. वेलरासू यांच्या हस्ते कळंबोली येथील पोलीस मुख्यालयाच्या मैदानात संपन्न झाले.



● रोहा तालुक्यातील नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब या शिक्षण संस्थेत महाराष्ट्र दिनानिमित्तचे ध्वजारोहण वार्षिक परीक्षा निकालात संपुर्ण संस्थेच्या विद्यालयात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होण्याचा बहुमान पटकावणाऱ्या विद्यार्थांना देण्यात आला.



● पीएनपी वेश्वि संकुल येथे होली चाईल्ड स्कुलच्या मुख्याध्यापिका निसर्गा चेवले यांच्या हस्ते ध्वजारोहन संपन्न झाले. यावेळी प्राचार्य नितेश मोरे, प्र प्राचार्य डॉ. ओमकार पोटे, प्राचार्य रविंद्र पाटील, मुख्याध्यापक निलेश मगर, मुख्याध्यापिका रिना म्हात्रे, मुख्याध्यापिका वेल्लईम्मल्ल, जनसंपर्क अधिकारी अमोल नाईक आणि शिक्षकवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

● श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधील अडचण फोन नं. ९९६०४५६९८६/८८०६४७९१७३, अलिबाग

● चेंबूर पूर्व मुंबई येथे स्टेशन जवळ ८६६ स्क्वेअर फूट कारपेट बालकनी सह १ कारपार्किंग नवीन टॉवर ॲमेनीटी सह ताबा ३ महिन्यात मिळणार १० वा मजला नवीन कॉम्प्लेक्स मध्ये फ्लॅट विकणे आहे. मोबाईल : ९८२१२११४८०/९५७७२१६४९९

● कुकूचकू पोल्ट्री फार्म प्रा. ली. मध्ये कामगार पाहिजे निजामपूर माणगाव रायगड येथे पिल्लेच्या पीक अप गाडीवर ड्रायवर पगार सर्व साधारण रुपये २५,००० प्रती महिना व सुपरवायजर १० वी पास रुपये १३,००० प्रती महिना पगार मिळेल कुटुंबासहित राहण्याची, लाइट व पाण्याची मोफत सोय आहे. मापगाव अलिबाग येथे वॉचमन पाहिजे शिक्षण १० वी पास पुरुष कामाचे ८ तास पगार १०,००० प्रती महिना संपर्क :- अनुष्का राऊत मॅडम ७७९८८८३८६४

● मॉटेसरी टीचर, आया (attendant) व पार्ट टाइम बेकरी शेफ हवा आहे. आया किड्स ॲक्टीव्हीटी सेंटरसाठी व Owner च्या मुलाला सांभाळण्यासाठी हवी असल्याने घरी राहाणारीच बघत आहोत. अनुभवी किंवा जबाबदार व मुलांची आवड असणारी हवी. संपर्क ९९२०७५२१४१/९४२२६९२४५०

● विद्यानगरमध्ये Fully Furnished Attached रुम paying Guest साठी देणे आहे. जेवणासकट किंवा जेवणाशिवाय भाडे ठरवता येईल. (लेडीज किंवा मॅरीड कपल्ससाठी) संपर्क : ९९२०७५२१४१

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१




● महावितरणच्या कल्याण परिमंडल कार्यालयात महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा झाला. मुख्य अभियंता धनंजय औंढेकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. तर, जागतिक कामगार दिनानिमित्त वर्षभरात उल्लेखनिय कामगिरी करणाऱ्या ५३ उत्कृष्ट तांत्रिक कर्मचाऱ्यांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करून गौरवण्यात आले. यावेळी महाव्यवस्थापक अनिल बऱ्हाटे, दीपक पाटील, निलकमल चौधरी, महेश अचिंनमाने, धैर्यशिल गायकवाड, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.




● महाराष्ट्र दिनानिमित्त माथेरानमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी नगरपरिषद प्रांगणामध्ये माथेरानचे मुख्याधिकारी तथा उत्तम प्रशासक राहुल इंगळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. तसेच, माथेरान मधील इंग्रजी माध्यमाची सेंट झेवियर हायस्कूलमधील विद्यार्थ्यांनी व्यसनमुक्तीवर पथनाट्य सादर करून उपस्थित नागरिकांची मने जिंकली. यावेळी माजी नगराध्यक्ष मनोज खेडकर, माजी नगरसेवक शिवाजी शिंदे, कुलदीप जाधव, राजेश दळवी, सुनील शिंदे, शिक्षक वर्ग, नागरीक व पालक उपस्थित होते.



● नेरळ गावातील बाल सायकल पट्टू हिरेन राम हिसालके याच्यासोबत महाराष्ट्र आणि आंतरराष्ट्रीय कामगार दिन साजरा करण्यासाठी दहा सायकल पट्टूंनी क्रांतिकारक आणि महापुरुषांना अभिवादन करण्यासाठी सायकल रॅली काढण्यात आली. यावेळी महाराष्ट्र दिनाचे महत्व पटवून देण्यासाठी या बाल सायकल पट्टूंकडून केलेल्या प्रयत्नांचे कौतुक होत आहे.



● नेरळ ग्रामपंचायत कार्यालयाबाहेर महाराष्ट्र दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या ध्वजारोहण कार्यक्रमात ग्रामविकास अधिकारी अरुण कारले यांनी ध्वज फडकावला. यावेळी सरपंच उषा पारधी, शिवाली पोतदार, कर्मचारी, पोलीस पाटील व शाळेतील शिक्षीका आदी उपस्थित होते.



● उरण तहसील कार्यालयाच्या परिसरात मान्यवरांचे हस्ते ध्वजारोहण सोहळा पार पडला. स्वतंत्र महाराष्ट्र होण्यासाठी असंख्य हुतात्म्यांनी आपलं बलिदान दिलं. या बलिदानाचे स्मरण आणि राष्ट्रध्वजाला वंदन करून सर्वांना महाराष्ट्र दिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी तहसीलदार डॉ. उद्धव कदम व मान्यवर उपस्थित होते.

# वरंध, महाबळेश्वर घाट रस्ता धोकादायक

## चौथा पावसाळा उजाडला तरी दुरुस्तीची कामे प्रलंबितच ; सार्वजनिक बांधकाम, महामार्ग विभागाचा ढिसाळ कारभार

**। महाड । वार्ताहर ।**

पश्चिम महाराष्ट्र आणि कोकणाला जोडणारे महाबळेश्वर आणि वरंध असे दोन्ही घाट वाहतुकीस धोकादायक बनले आहेत. सन २०२१ च्या पावसाळ्यात बाधित झालेला रस्ता यावर्षीदेखील डेंजर झोनमध्ये असून, तब्बल चार वर्षांनी घाटातील दुरुस्तीच्या कामांना सार्वजनिक बांधकाम विभाग राष्ट्रीय महामार्ग विभागाने आता युद्ध पातळीवर सुरुवात केली आहे. या अजब कारभारावर स्थानिक रहिवासी, पर्यटक व मालवाहतूकदारांकडून संताप व्यक्त केला जात आहे.



पश्चिम महाराष्ट्रातील सातारा आणि पुणे या दोन जिल्ह्यांना जोडणाऱ्या महाबळेश्वर आणि वरंधा भोर घाटाची सन २०२१ मधील अतिवृष्टीमध्ये मोठी हानी झाली होती. दोन्ही घाटात मोठ्या प्रमाणावर दरड कोसळल्याने पूर्णपणे वाहतुकीस बंद झाले होते. संपूर्ण घाटात दरडी कोसळून घाट मार्ग तब्बल सहा महिने बंद होता. घाटात अनेक ठिकाणी भूस्खंलन आणि भेगा पडल्याने महाबळेश्वर आणि वरंध घाट वाहतुकीस धोकादायक बनला होता. या भेगा रस्त्यावर आलेल्या दरडी, मातीचा भराव हटवून तात्पुरत्या स्वरूपात दुरुस्ती करण्यात आली होती. वरंध आणि महाबळेश्वर या दोन्ही घाटात महाड सार्वजनिक बांधकामाने काही अंशी कामे करून घाटातील वाहतूक सुरळीत केली होती. वरंधा घाट हा राष्ट्रीय महामार्ग विभागाकडे सुपूर्द केला आहे, तर महाबळेश्वर घाटात महाबळेश्वर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अंतर्गत आलेल्या मार्गाची आजदेखील दुरवस्था आहे. ठिकठिकाणी कामे सुरु असून, मातीचा भराव या पावसाळ्यात पुन्हा रस्त्यावर येण्याची शक्यता या महामार्गावरून प्रवास करणाऱ्या पर्यटकांच्या व स्थानिक माल वाहतूकदारांच्या बोलण्यातून स्पष्टपणे जाणवत आहे.

उन्हाळ्यात येणाऱ्या पर्यटकांमुळे घाट मार्ग दुरुस्त करता आला नसल्याचे अजब उत्तर सार्वजनिक बांधकाम विभागाने दिले होते. या घाटात रस्त्यावर आलेल्या दरडी हटवण्यात आल्या असल्या तरी रस्त्याला लागून असलेल्या दगडी आणि माती अद्याप काही ठिकाणी हटवण्यात आलेल्या नाहीत. महाबळेश्वरसार्वजनिकबांधकामउपविभागाने दुरुस्तीच्या कामाला युद्धपातळीवर काम सुरु केल्याचे दाखवले आहे. यामध्ये प्रतापगडपासून महाबळेश्वरपर्यंतच्या रस्त्याचे नव्याने डांबरीकरण सरंक्षक भिंती, गॅबियन पद्धतींच्या भिंती, नाले सफाई आदींचा समावेश आहे. अवाढव्य स्वरूपात आलेल्या मातीच्या आणि दगडी दरडी पाहता सद्यः स्थितीत बांधत असलेल्या संरक्षक भिंती आणि गॅबियन भिंती किती तग धरतील, हा एक प्रश्न निर्माण झाला आहे.

### कामे संथ गतीने सुरू

**सन २०२४ चा पावसाळा सुरू होण्यास फक्त एक महिन्याचा कालावधी शिल्लक असताना ही कामे अद्याप संथ गतीने चालू आहेत. महाबळेश्वर घाटातील प्रतापगडपासून महाबळेश्वरपर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण जरी पूर्ण झाले असले, तरी रस्त्यावरील २०२१ च्या नैसर्गिक आपत्तीमध्ये ज्या नदी नाल्यांवरील मोठ्या व लहान पुलांचे प्रमाणावर नुकसान होऊन क्षतिग्रस्त झाले होते त्यांची कामे अत्यंत धीम्या गतीने चालू आहेत. मागील तीन वर्षांच्या काळात सार्वजनिक बांधकाम उपविभाग महाबळेश्वर यांनी डोळेझाक करून या कामांच्या पूर्णत्वाकडे का गप्प बसले होते, असा प्रश्न निर्माण झाला आहे.**

महाबळेश्वर घाटात सन २०२१ च्या पावसाळ्यात झालेल्या अतिवृष्टीने नुकसान झाले होते. सातारा जिल्ह्याच्या प्रतापगडच्या हद्दीपासून महाबळेश्वरपर्यंतच्या रस्त्याच्या नव्याने डांबरीकरणाचे काम पूर्ण झाले असले तरी पुढील वर्षी या या राष्ट्राचे कॉंक्रीट करण्याचे काम हाती घेतले जाईल, असे सार्वजनिक बांधकाम विभाग महाबळेश्वरचे उपविभागीय अभियंता अजित देशपांडे यांना विचारले असता त्यांनी याबाबत या गोष्टीला दुजोरा दिला.



# दिघोडे गावात चोरांचा शिरकाव

**। उरण । वार्ताहर ।**

पोलीस यंत्रणा लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने कामाला लागली आहे. त्याचा फायदा उठवत अज्ञात चोरांनी दिघोडे गावात शुक्रवारी (दि.२६) रात्रीच्या अंधाराचा फायदा उठवत शिरकाव केला. मात्र, रहिवाशांच्या सावधगिरीमुळे चोरांना पळता भुई थोडी झाली आहे.

उरण तालुक्यात याअगोदर जासई, धुतूम, चिरनेर, कळंबुसरेसह इतर गावात चोरांनी हैदोस घातला होता. त्यामुळे रहिवासी भीतीच्या सावटाखाली वावरताना दिसत होते. रहिवाशांनी पोलीस यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर संशय व्यक्त केला असता, उरण पोलिसांना काही चोरांना बेड्या ठोकण्यास यश आले. सध्या लोकसभा निवडणुकीबरोबर लग्न सोहळ्याची धामधूम सुरू असल्याचा फायदा उठवत रात्रीच्या अंधाराचा फायदा उठवत अज्ञात चोरांनी दिघोडे गाव शिरकाव केल्याची घटना घडली. मात्र, रहिवाशांच्या सावधगिरीमुळे चोरांना पळता भुई थोडी झाली आहे.

### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

# कर्जतचा परा ४४ अंशांवर

### वर्षातील सर्वात उष्ण दिवसाची नोंद

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

राज्यातील उष्णतेमुळे सर्वत्र तापमान वाढले आहे. त्याबाबत सरकारकडून उष्णतेबद्दल काळजी घेण्याचे आवाहन केले होते. दरम्यान, २९ एप्रिल रोजी कर्जत तालुक्यातील तापमान ते ४४ डिग्री पर्यंत पोहचल्याचे सर्वांच्या मोबाईलवरून मेसेज फिरत होते. त्यामुळे हा दिवस कर्जत तालुक्यातील सर्वात गरम दिवस ठरला.

कर्जत तालुका येथील प्रदूषण मुक्त वातावरणामुळे हा तालुका फार्म हाऊस तालुका बनला आहे. देशात कर्जत तालुक्याची ओळख फार्म हाऊसचा तालुका म्हणून प्रसिद्ध आहे. त्यात या भागातील फार्म हाऊसमुळे वनराई वाढली आहे आणि जंगलदेखील वाढले आहे.त्यामुळे कर्जत तालुक्यात फारशी उष्णता जाणवत नाही. मात्र, यावर्षी राज्यात उष्णतेची लाट पसरली होती. त्यामुळे कर्जत तालुक्यात यावर्षीचे सर्वात उष्ण दिवस ठरला आहे. कर्जत तालुक्यात अनेकांच्या मोबाईलवर ४४ डिग्री तापमान असल्याचे दिसून येत होते. दुपारी बाराच्या सुमारास कर्जत तालुक्यातील तापमान ४१ डिग्रीपर्यंत होते. नंतर दुपारी ते वाढून ४२ डिग्री होते.

त्यानंतर दुपारी दोन वाजता ४३ डिग्री वाढले आणि तीन वाजता कर्जतचे तापमान ४४ डिग्रीवर गेले होते. त्यामुळे हा दिवस कर्जत तालुक्यातील सर्वात उष्ण दिवस ठरला आहे. तालुक्यातील सरकारी यंत्रणेकडील तापमान हे ४३.८




डिग्री नोंदवले गेले आहे. कर्जत येथील भात संशोधन केंद्रात आजच्या तापमानाची नोंद ४३.८ डिग्री नोंदवले गेले असून, ते साधारण ४४ डिग्रीच्या आसपास होते.

# स्टेनलेस स्टील कॉइलची चोरी

**पनवेल :** गोडाऊनच्या गेटमधून प्रवेश करून गोडाऊनचा कोयंडा तोडला आणि गोडाऊन मधील २६ लाख ५७ हजार ३६ रुपयांच्या स्टेनलेस स्टील चोरी केल्याप्रकरणी अनोळखी ईसमाविरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. महेंद्र अंगारा यांचे मुंबई येथे स्टेनलेस स्टीलचे होलसेल व्यापाराचे कार्यालय आहे. त्यांनी कळंबोली येथे गोडाऊन घेऊन त्यात स्टेनलेस स्टीलचा माल साठवणूक करून ठेवतात. यावेळी त्यांच्या गोडाऊनमध्ये दोन ते तीन इसमांनी गेटचा कोयंडा तोडून आत प्रवेश केला आणि त्यांच्याकडील टेम्पोमध्ये स्टेनलेस स्टील कॉइल सामान भरून घेऊन ते निघून गेले.

# ‘दांड–मोहोपाडा रस्त्यावरील अवजड वाहतूक थांबवा’

**। रसायनी । वार्ताहर ।**

रसायनी पाताळगंगा परिसरातील अतिरिक्त एमआयडीसीत अनेक कारखाने उभे राहात आहेत. त्यामुळे या ठिकाणी अवजड वाहनांची वर्दळ वाढली आहे. दांड-रसायनी रस्त्यावरील मोहोपाडा मुख्य रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतूककोंडी होत आहे. शिवाय, लहान-मोठे अपघातांचे प्रमाणही वाढत असल्याने अनेकांना जीव गमवावा लागला आहे. त्यामुळे परिसरातील अवजड वाहतूक बंद करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे जिल्हा उपाध्यक्ष राकेश खराडे यांनी केली आहे.

मोहोपाडा ते मिनीडोअर थांब्यापर्यंत रोजच वाहतूककोंडी होत आहे. मोहोपाडा थांब्यापासूनचा रस्ता अरुंद असल्यान कोंडीत भर पडत आहे. रसायनी व आसपासच्या परिसराची मोहोपाडा ही मुख्य बाजारपेठ असल्याने बाजारहाट करण्यासाठी परिसरातील नागरिक येत असतात. यावेळी वाहने रस्त्याशेजारी लावून वाहतूक खोळंबा करतात.

मोहोपाडा ते चांभार्ली या परिसरात नवीन बाजारपेठेसाठी एमआयडीसीने जागा उपलब्ध करून देण्याची गरज निर्माण झाली असल्याचे राकेश खराडे यांनी सांगितले.


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी–सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


# गुरे चोरीमुळे शेतकरी हवालदिल

### म्हसळा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल

**। म्हसळा । वार्ताहर ।**

तालुक्यातील शेतकऱ्यांनी रानावनात किंवा गावाचे आसपास चरण्यासाठी सोडलेली गुरे घरात परत येतच नसल्याने ती जातात कुठे असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे. म्हसळा तालुक्यात अनेक शेतकऱ्यांची दुभती गाय जनावरे आणि नागरिकांचे बैल चोरीला जात असल्याची घटना व तक्रारीत वाढ झाली आहे. त्यामुळे शेतकरी हवालदिल झाले आहेत.

दरम्यान, गोधन चोरीला गेल्याच्या अनेक घटनांचा उलगडा होऊन पोलिसांनी आरोपींनी बेड्या ठोकल्या असल्या तरी गोधन चोरीच्या घटना अधूनमधून घडतच आहेत. म्हसळा शहराला लागुनच असलेल्या खारगाव खुर्द येथील शेतकरी चंद्रकांत पांडुरंग कांबळे यांच्या मालकीची पांढऱ्या रंगाची नऊ वर्षांची दुभती गाय आणि दोन वर्षांची कालवड एप्रिल महिन्यापासून चोरीला गेली आहे.

याबाबत शेतकरी चंद्रकांत कांबळे यांनी म्हसळा पोलीस ठाण्यात गोधन चोरी झाल्याची लेखी तक्रार दाखल केली आहे. या गंभीर घटनेची दखल घेऊन पोलिसांनी गुरेचोरी करणाऱ्यांवर पाळत ठेवून कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

# शॉर्टसर्किटमुळे वीजपुरवठा खंडित

### ग्राहकांच्या तक्रारींकडे महावितरणचे दुर्लक्ष

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

उन्हाचा तडाखा वाढला असून, बहुसंख्य लोक घरात बसून पंख्याची हवा घेत उकाड्यापासून दूर राहण्याचा प्रयत्न करतात. मात्र, कर्जत तालुक्यात सर्वत्र वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यात प्रामुख्याने शॉर्टसर्किटमुळे वीजपुरवठा खंडित होत असल्याच्या ग्राहकांच्या तक्रारी वाढल्या आहेत. दरम्यान, महावितरणकडून ग्राहकांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष केले जात असल्याने महावितरणविरुद्ध संताप व्यक्त होत आहे.

कर्जत तालुक्यात गेल्या महिन्याभरात प्रत्येक दिवशी वीजपुरवठा खंडित झाला आहे. त्यावेळी महावितरणकडे चौकशी करण्याचा प्रयत्न केला असता महावितरणकडून त्यांच्या



कार्यालयातील दूरध्वनीवर संपर्क होत नाही. त्यामुळे वीज ग्राहक संतप्त झाले असून, वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा यामुळे महावितरण निरुत्तर होत असल्याने ग्राहक संतप्त आहेत. वारंवार खंडित होणाऱ्या वीज पुरवठा बद्दल माथेरान येथील वीज ग्राहक जनार्दन पारटे यांनी महावितरणकडे पत्र पाठवून आपला संताप व्यक्त केला आहे.

वीज विभागाचे मुख्यालय असलेल्या प्रकाश गड येथील मुख्य अभियंता यांना त्यांनी पत्र पाठवून आपली नाराजी व्यक्त केली आहे. काही तांत्रिक दोषामुळे शॉर्टसर्किटमुळे स्पार्किंग होत असते. दरम्यान, वीजपुरवठा खंडित न झाल्यामुळे आणि सतत होणाऱ्या स्पार्किंगमुळे आग लागणे तसेच विजेच्या प्रवाहामधून काही वीज गळती झाल्यास जीवितहानी होण्याची दाट शक्यता असते.

दरम्यान, ही गंभीर बाब लक्षात घेऊन महावितरणचे मुख्य अभियंते आणि कर्मचारी वर्ग हे अनेक ठिकाणच्या फिडरवर १०० एंपियरचे सर्किट ब्रेकर न लावता थेट डायरेक्ट लाईन जोडतात. त्यामुळे शॉर्ट सर्किट झाल्यास त्या त्या विभागातील वीजपुरवठा त्वरित खंडित होत नाही. त्यामुळे हा लोड कळंबोली येथील एक्सप्रेस फिडर येतो आणि तेथील हेवी ड्युटी ८०० एंपीयरचे आटो सर्किट बेकर ब्रेक होतात. त्यामुळे कर्जत, खालापूर, खोपोली या विभागतील वीजपुरवठा हा वारंवार खंडित होतो आहे. त्यास सर्वस्वी महाविरणचे अभियंते आणि लाईनमन जबाबदार आहेत, असा आरोप पारटे यांनी केला आहे. याप्रकरणी विभागातील महावितरणचे अधीक्षक अभियंता, मुख्य अभियंता, उपअभियंते, लाईनमन यांना जबाबदार धरून मुख्य सचिव यांनी या कामचुकार कर्मचारी वर्गावर नियमानुसार योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी जनार्दन पारटे यांनी आपल्या तक्रारी अर्जात केली आहे.

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,मौजे परहूरपाडा, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीच्या विद्यमान मालक श्रीमती सिमा विलास जोशी यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याबाबत आमचे अशिलांच्या वाटाघाटी चालू आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| परहूरपाडा | १२८ | ०-४१-०० | ०.९० |

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, अदलाबदल, कुळवहिवाट, कसवणुक वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

ता. २/५/२०२४

**ॲड. माधवी नारायण ठाकूर**
सी-३०१, ‘क्लिफ हेवन’
को. ऑप. हा. सोसायटी,
स्टेट बँक ऑफ इंडियाच्या बाजूला,
कोर्ट रोड, अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

# मोहोपाड्यात सुसज्ज रुग्णालयाची गरज

**। रसायनी । वार्ताहर ।**

रसायनी पाताळगंगा हे नावारूपास आलेले ठिकाण आहे. शहरालगत दांड-रसायनी, मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग असून, या महामार्गावरून हजारो वाहनांची वाहतूक होत असते. प्रचंड वाहतुकीमुळे या महामार्गावर नेहमी अपघात होत असतात. अपघात झाल्यानंतर गंभीर जखमींना पुढील उपचारासाठी मुंबईला न्यावे लागत आहे. या प्रवासात बराचसा वेळ वाया जात असल्याने काही वेळेला रूग्णाला रस्त्यातच आपला प्राण गमवावा लागत असतो. यासाठी मोहोपाडा येथे सुसज्ज अशा शासकीय रुग्णालयाची आवश्यकता आहे.

मोहोपाडा येथे आरोग्य उपकेंद्र सन २००९ मध्ये उभारण्यात आले आहे. या आरोग्य उपकेंद्रात आरोग्यसेवक सेविका व डॉक्टर रूग्णांची समस्या जाणून घेत आहेत. मोहोपाडा उपकेंद्राच्या हद्दीत तळेगाव, तळेगाववाडी, पानशिल, शिवनगरवाडी, शिवनगर, चांभार्ली, मोहोपाडा, नवीन पोसरी, शिंदीवाडी, रिसवाडी, आंबिवली आदींसह आणखी सात ते आठ गावांचा समावेश होत असून, या गावात आरोग्य सेवक हे घरोघरी फिरून आरोग्यविषयक जनजागृती करीत असून त्यांच्यावरील कामाचा ताण वाढत असल्याचे त्यांचे म्हणणे आहे.

दरम्यान, मोहोपाडा येथील उपकेंद्रात रुग्णांना वेळेवर उपचारासाठी योग्य व्यवस्था नसल्याने परिसरातील रुग्ण चौक, लोहोप, अजिवली येथील शासकीय रुग्णालयात उपचारासाठी जात असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. उपकेंद्रात येणाऱ्या रुग्णांची संख्या फार कमी आहे. येथील सेविका प्रसूती करीत असून, येथे अनेक गरीब व गरजू महिलांचे बाळंतपण होत आहे.

सर्पदंश झाल्यास तात्काळ औषधोपचाराची सुविधा येथे उपलब्ध नसल्याने रुग्णांना लोहोप, चौक आरोग्य केंद्रात जावून उपचार घ्यावे लागत आहेत. यामुळे तात्काळ उपचार न मिळाल्याने जीव गमावण्याची वेळ अनेक रुग्णांवर ओढवली आहे. वासांबे-मोहोपाडा ग्रामपंचायतीच्या हद्दीत ५० हजारांपेक्षा जास्त लोकसंख्या असून, येथील आरोग्य उपकेंद्र पाहता आरोग्य सेवक, सेविका व डॉक्टरांची कमतरता भासत आहे.

शासनाच्या निर्णयानुसार पाच हजार लोकसंख्येला एक आरोग्य सेवक व दोन डॉक्टर अशी सोय असतानाही येथील लोकसंख्या पाहता परिसरात सुसज्ज प्राथमिक आरोग्य केंद्र असावे याकरिता सन २०१२ मध्ये परिसरातील शिवनगर येथे प्राथमिक आरोग्य केंद्र उभारणीसाठी वासांबे मोहोपाडा ग्रामपंचायतीने जागेची व्यवस्था शिवनगर वाडी येथे करून दिली असून, सदर प्रस्ताव काही वर्षांपासून जिल्हा परिषदेकडे धूळ खात पडून आहे.

# कर्तव्यनिष्ठ अधिकारी जनतेच्या आठवणीत

**। रसायनी । वार्ताहर ।**

कर्तव्यनिष्ठ अधिकारी जनतेच्या आठवणीत राहतो आणि वरिष्ठांच्या मर्जित राहतो, त्यामुळे सर्वसामान्य माणसाला आपले शासकीय योजनेतील आपले काम करणे सोपे जाते, असे भावनिक उद्‌गार उपविभागीय कृषी अधिकारी नितीन फुलसुंदर यांनी काढले.

खालापूर तालुका कृषी पर्यवेक्षक एस.टी. धुमाळ यांची पदोन्नतीने होऊन ते मंडळ कृषी अधिकारी तालुका खामगाव येथे बदली झाल्याने त्यांचा निरोप समारंभ तालुका कृषी अधिकारी कार्यालय खोपोली यांनी



आयोजित केला होता. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी ए.टी. धुमाळ यांना शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ आणि भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. ए.टी. धुमाळ यांनी खालापूर तालुक्यात चांगले काम केले असून, अनेक शेतकऱ्यांना त्यांनी लाभ दिला आहे. कृषी विभागाच्या अनेक योजना त्यांनी शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवल्या आहेत. एक कर्तव्यनिष्ठ आणि प्रामाणिक अधिकारी म्हणून त्यांच्याकडे पाहिले जायचे. कार्यक्रमात अनेक मान्यवरांनी ए.टी. धुमाळ यांच्याबद्दल गौरवोद्‌गार काढले.

या कार्यक्रमास खालापूर मंडळ कृषी अधिकारी जे.के देशमुख, कृषी परीवेक्षक चौक नितीन महाडिक,जेष्ठ पत्रकार अर्जुन कदम, कृषी विभाग कार्यालयातील सर्व कृषी पर्यवेक्षक, कृषी सहाय्यक, कार्यालयीन कर्मचारी, उपविभागातील कर्मचारी, शेतकरी उपस्थित होते.

### जाहीर नोटीस

सर्व जनतेस कळवण्यास येते की, आमचे आशिलांनी मौजे चेंढरे, ता. अलिबाग येथील खालील वर्णनाची बिनशेती जमिन व घर मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक श्री. राजेंद्र भास्कर पवार व श्री. नितीन भास्कर पवार यांचेकडून विकत घेण्याचे ठरवून तसा व्यवहार आमचे अशिल व विद्यमान मालक यांचेमध्ये ठरलेला आहे.

**बिनशेती जमिन व घर मिळकतीचे वर्णन**

| मौजे | सर्वे नं. | क्षेत्र (चौ.मी.) | आकार |
|---|---|---|---|
| चेंढरे | १०३/१/अ/१२/१६ | ४.५८.०० | ६४.१२ |

तसेच सदरहू मिळकतीवर असलेले नगरपरिषद अलिबाग घर मालमत्ता क्र. ALB000000893 त्यास (जुना मालमत्ता क्र.६५३,Z1SB3000895) मालक राजेंद्र भास्कर पवार व नितीन भास्कर पवार यांचे मालकीचे बिगरनिवासी लॉज, क्षेत्र ९५.५७ व क्षेत्र ११४.८५ हा या पावतीचा विषय आहे.

तरी वर वर्णन केलेल्या बिनशेती जमीन व घर मिळकत विद्यमान मालकांच्या ताबे कब्जाची, वहिवाटीची, निर्वेध, बोजाविरहित, विकण्यायोग्य असल्याची हमी विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिली आहे. तरी वरील मिळकती संबंधी कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, मालकी, गहाण, दान, बक्षिस, विक्रीचा करार, दावा, लिज, अन्नवस्त्र, हवाला, पोटगी, चार्ज, ताबा, वहिवाट, भाडेपट्टा, वाटणी, बोजा असल्यास अथवा त्यांची या व्यवहारास हरकत असल्यास आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे कालावधीत लेखी नोंदवावी. या कालावधीत कोणतीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदरहू मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली कोणतीही हरकत आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दि.०२.०५.२०२४

**मिलिंद चव्हाण**
ॲडव्होकेट
८.आनंद अपार्टमेंट, श्रीबाग-३, अलिबाग

### पनवेल महानगरपालिका

ता.पनवेल, जिल्हा - रायगड, पनवेल - ४१०२०६.

जाहिर प्रकटन

पनवेल महानगरपालिका हद्दीतील सर्व रहिवासी मिळकत धारकांना या जाहिर प्रकटनद्वारे कळविण्यात येते की, जिवीत व वित्तीयहानी टाळण्यासाठी ज्या मिळकत, इमारती धोकादायक झाल्या आहेत अथवा त्यांचा काही भाग धोकादायक झाला आहे, अशा इमारतीमध्ये किंवा मिळकतीमध्ये कोणतेही वास्तव करु नये.

ज्या अर्थी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २६४ मध्ये नमुद केल्यानुसार ज्या इमारतींना ३० वर्ष पुर्ण झाली आहेत व ज्या आर्थी इमारतीचा प्रत्येक भाग आणि तदंगभूत प्रत्येक वस्तू तिच्यापासून धोका निर्माण होणार नाही अशा रीतीने दुरुस्त करुन सुस्थितीत ठेवणे हे प्रत्येक इमारतीच्या मालकाचे आवश्यक कर्तव्य आहे.

ज्या अर्थी पनवेल महानगरपालिकेतील सर्व मिळकतधारक यांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २६५ अन्वये इमारतीचे मालक, भोगवटादारांनी सदर इमारतीचे नोंदणीकृत बांधकाम अभियंता (Structural Engineer) यांच्याकडून तपासणी (Structural Audit ) करुन आवश्यकता असल्यास त्यांच्या देखरेखेखाली इमारतीची दुरुस्ती करुन बांधकाम सुस्थिती प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

ज्या अर्थी पनवेल महानगरपालिका हद्दीतील मिळकतधारकांनी स्ट्रक्चर ऑडिट रिपोर्ट सादर केला आहे. परंतु, ७९ मिळकतधारकांनी आजपावेतो सदरची धोकादायक इमारती/ बांधकामे रिकामी केलेली नसल्याने, पावसाळ्यामध्ये धोकादायक इमारती पडून हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यांची यादी महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर (Website) प्रसिध्द करणेत आलेली आहे.

त्याअर्थी संबंधितांनी अशा धोकादायक इमारती/बांधकामे तात्काळ रिकामी करुन अशी बांधकामे तात्काळ पाडून/उतरवून घ्यावीत अन्यथा अशा धोकादायक इमारती पडून कोणत्याही प्रकारची जिवित वा वित्तीयहानी झाल्यास त्यास संबंधित घरमालक/भोगवटादार हे जबाबदार राहतील या बाबतीत महानगरपालिका जबाबदार राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

सही/-
**(डॉ. प्रशांत रसाळ)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**पनवेल महानगरपालिका**

पमपा/अ.बां.नि./२४२४/जा.क्र १६०/ २०२४
दिनांक : ३०/०४/२०२४

**निवडक**

### मोठ्या मनाचा बुमराह

**मुंबई :** आयपीएल स्पर्धेत मंगळवारी लखनौ विरुद्ध मुंबईत पार पडला. सामन्यात लखनौने ४ गडी राखून विजय मिळवला. या सामन्यात बुमराहचा एक छोटा फॅन मात्र भलताच खूश झाला, त्याला कारणही तसेच ठरले. त्या छोट्या फॅनला बुमराहकडून एक अनमोल भेट मिळाली. या सामन्यानंतर बुमराहने स्टॅंडमधून त्याचा ऑटोग्राफ मागणाऱ्या एका लहान मुलाला पाहिले आणि डोक्यावरील पर्पल कॅप काढून लगेचच त्याला दिली. इतकंच नाही, तर त्याला ऑटोग्राफही दिला. यानंतर तो चाहता खुप आनंदित झाला.

### राहूलसाठी रितेशची बॅटिंग

**मुंबई :** भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने टी-२० विश्वचषकासाठी भारतीय संघाची घोषणा केली आहे. बीसीसीआयने भारतीय संघाच्या कर्णधाराची जबाबदारी रोहितकडे सोपवली आहे. बीसीसीआयने संघाची घोषणा केल्यानंतर काही लोक आनंदी झाले, तर काही लोक नाराज झाले आहेत. रितेशने एक ट्विट शेअर करून केएल राहुलला टीममध्ये न घेतल्याने नाराजी व्यक्त केली. रितेशनं ट्विटमध्ये लिहिले की, टी-२० विश्वचषकाच्या संघात केएल राहुलला घ्यायला हवं होते.

### संजूची पोस्ट व्हायरल

**नवी दिल्ली :** अगामी टी-२० विश्वचषकासाठी भारतीय संघाची घोषणा करण्यात आली. या संघात राजस्थान रॉयल्सचा कर्णधार सॅमसनला देखील स्थान मिळाले आहे. पंतचा बॅक अप यष्ठीरक्षक म्हणून सॅमसनचे नाव संघात आले आहे. भारतीय संघाची घोषणा होताच केरळच्या सॅमसनने मल्याळममध्ये एक पोस्ट केली. इन्स्टाग्रामवर केलेल्या या पोस्टचा अर्थ खूप सुंदर आहे. 'घामानं अन् कष्टानं विणलेली जर्सी!' असे या मल्याळम पोस्टचे भाषांतर होते. सॅमसनला ही जर्सी भारताची असल्याचे सुचित करायचे आहे.

### ऋतुराजसाठी उठवला आवाज

**नवी दिल्ली :** विश्वचषकासाठी जाहीर केलेल्या संघावरून बरीच चर्चा सुरू आहे. निवडलेल्या खेळाडूंवर कोणाचा आक्षेप नाही, परंतु काही खेळाडूंच्या जागी दुसऱ्यांनी संधी नक्की देता आली असती. आयपीएलमध्ये विराटनंतर सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांमध्ये ऋतुराज येतो. ९ सामन्यांत ४४७ धावा केल्या आहेत. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्येही त्याचा रेकॉर्ड चांगला आहे. असे असूनही राखीव खेळाडूंमध्येही त्याचा विचार केला गेला नाही. ऋतुराजला मिळालेल्या वागणुकीवर माजी खेळाडू श्रीकांत यांनी नाराजी व्यक्त केली.

### संघात बदलाची शक्यता

**नवी दिल्ली :** आयसीसीने टी-२० विश्वचषकासाठी आपला संघ घोषित करण्याची शेवटची तारीख १ मे ठेवली होती. अनेक देशांनी आपल्या संघाची घोषणा केली आहे. दरम्यान, बीसीसीआयला आपल्या निवडलेल्या संघात अजूनही बदल करता येउ शकतो. आयसीसीच्या खास नियमानुसार हा बदल करता येतो. संघात बदल करण्याची मुदत ही २५ मे पर्यंत असेल. नियमानुसार हा बदल करण्यासाठी आयसीसीची परवानगी घेण्याची गरज नाही. मात्र, २५ मे नंतर जर संघात बदल करायचा असेल तर त्यासाठी आयसीसीची परवानगी आवश्यक आहे.

# मुंबईचा मार्ग खडतर

## लखनौकडून लाजिरवाणा पराभव

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

पाच वेळा विजेत्या ठरलेल्या मुंबईला यंदाच्या आयपीएल मोसमात सपाटून मार खावा लागत आहे. लखनौने मंगळवारी झालेल्या लढतीत मुंबईवर चार बळी राखून विजय मिळवला. लखनौचा हा सहावा विजय ठरला. तर, मुंबईला सातव्या लाजिरवाण्या पराभवाला सामोरे जावे लागले. त्यामुळे हार्दिक पांड्याच्या कर्णधारपदावर प्रश्न उपस्थित होत आहेत. या हंगामात आतापर्यंत मुंबईने १० सामने खेळले आहेत, ज्यामध्ये संघाने ७ हरले असून ३ सामने जिंकले आहेत. आता प्लेऑफमध्ये पोहोचण्याच्या मुंबईच्या आशांना सुरुंग लागला आहे.

मुंबईकडून लखनौसमोर १४५ धावांचे आव्हान ठेवण्यात आले होते. तुषाराच्या गोलंदाजीवर अर्शिन कुलकर्णी शून्यावर बाद झाला; पण त्यानंतर कर्णधार के.एल.राहुल (२८) व स्टॉयनिस (६२) यांनी लखनौसाठी ५८ धावांची भागीदारी रचली; पण राहुल, स्टॉयनिस व हूडा (१८) हे बाद झाल्यानंतर टर्नर व बदोनीलाही अपयश आले. अखेर पूरन (नाबाद १४) व कृणाल पांड्या (नाबाद एक) यांनी लखनौच्या विजयावर शिक्कामोर्तब केले.

मुंबईच्या फलंदाजांकडून सपशेल निराशा झाली. किशन (३२), वधेरा (४६) व डेव्हिड (नाबाद ३५) यांनी थोडीफार चमक दाखवल्यामुळे मुंबईला सात बाद १४४ धावांपर्यंत मजल मारता आली. मोहसिनने दोन, तर मयंक, नवीन, स्टॉयनिस व बिश्नोई यांनी प्रत्येकी एक फलंदाज बाद केला.



### पांड्यासह मुंबई संघांवर कारवाई

**या सामन्यातील पराभवानंतर मुंबईच्या अडचणी वाढल्या आहेत. या संघाला आता प्ले ऑफमधून बाहेर पडण्याचा धोका आहे. सामना गमावल्यानंतर कर्णधार हार्दिक पांड्यासह मुंबईवर बीसीसीआयने मोठी ॲक्शन घेतली आहे. आणि आता पांड्यावर एका सामन्यावर बंदी घातली जाण्याचा धोका आहे. सामन्यात मुंबई संघ स्लो ओव्हर रेटसाठी दोषी आढळला होता. यानंतर बीसीसीआयने संघाचा कर्णधार हार्दिक पांड्याला २४ लाखांचा दंड ठोठावला आहे. याआधी एकदा मुंबईचा संघ स्लो ओव्हर रेटसाठी दोषी आढळला होता. आता दुसऱ्यांदा हार्दिकला दंड ठोठावण्यात आला आहे. केवळ हार्दिक पांड्याच नाही तर संपूर्ण संघातील खेळाडूंना शिक्षा झाली आहे. हार्दिक व्यतिरिक्त संघातील इतर खेळाडूंना २५-२५ टक्के मॅच फीचा दंड ठोठावण्यात आला आहे. मुंबई पुन्हा तिसऱ्यांदा दोषी आढळल्यास कर्णधार हार्दिक पांड्यावर एका सामन्याची बंदी घातली जाऊ शकते.**

# गोट्यांच्या खेळात रमली तरुणाई

## ■ गावागावात आजही पारंपारिक खेळाची क्रेझ

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

शाळांना सुट्टी पडली आहे. त्यामुळे अनेक गावांमधील तरुणाई वेगवेगळ्या खेळामध्ये रमू लागली आहे. त्यामध्ये पारंपारिक गोट्यांच्या खेळांचा क्रेझ आजही मोबाईलच्या जगतामध्ये टिकून असल्याचे दिसून आले आहे.

दहा ते पंधरा वर्षापुर्वी शाळेला सुट्टी पडल्यावर अनेक मुले गल्ली, अंगणात गोट्यांचा खेळ खेळत असत. त्यामुळे सकाळी व संध्याकाळच्या वेळेला हा परिसर बच्चे कंपनीने फुलून जात होता. मात्र, गेल्या काही वर्षापासून हा खेळ कालबाह्य होण्याच्या मार्गावर होता. मोबाईलमध्ये वेगवेगळे खेळ असल्याने अनेक बच्चे कंपनी सुट्टीमध्ये मोबाईलवरच पपजी, फ्रि फायर सारखे खेळ खेळण्यामध्ये मग्न असत. त्यामुळे गल्ली व अंगणातील मुलांचा किलबिलाट नाहीसा होऊ लागला होता. परंतु, गोट्या खेळाला पुन्हा नवसंजीवनी मिळत असल्याचे चित्र दिसून येत आहे. जिल्ह्यातील काही गावांमधील मुले पारंपारिक खेळ गोट्या खेळत असल्याचे दिसून आले आहे. दोन गट निर्माण करून गोट्या खेळण्याचा खेळ ठिकठिकाणी खेळत असल्याचे पहावयास मिळत आहे.



> गोट्या हा पारंपारिक खेळ आहे. पुर्वी हा खेळ गावात मोठ्या प्रमाणात खेळला जात होता. मात्र, मोबाईलमुळे या खेळाकडे दुर्लक्ष झाले होते. पुन्हा एकदा हा खेळ उन्हाळी सुट्टीत खेळण्यास सुरुवात झाली आहे. एकाग्रता निर्माण करण्याबरोबरच एकत्र राहण्याची शिकवण या खेळातून मिळत आहे.
>
> – दयानंद पाटील, महाजने

# माथेरान व्हॅली स्कूलचे उत्तुंग यश




**। नेरळ । प्रतिनिधी ।**

शिर्डी येथे राष्ट्रीय कुम बोकातोर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. राष्ट्रीय स्तरावरील पहिल्या स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील वंजार पाडा येथील माथेरान व्हॅली इंग्लिश मिडीयम स्कूलने उतुंग यश मिळविले आहे.

महाराष्ट्र राज्यातील शिर्डी येथे झालेल्या पहिल्या राष्ट्रीय कुम बोकातोर स्पर्धेत माथेरान व्हॅली इंग्लिश मीडियम स्कूलच्या पाच खेळाडूंनी यशस्वी कामगिरी केली आहे. या पहिल्या वहिल्या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्र संघाला पहिल्या क्रमांकाचा पुरस्कार मिळाला. त्यात माथेरान व्हॅली शाळेच्या विद्यार्थ्यांचे मोठे योगदान राहिले आहे. माथेरान व्हॅली इंग्लिश मीडियम स्कूलचे पाच सुवर्ण पदक आणि तीन रौप्य पदके मिळवून उतुंग यश संपादन केले. या शाळेच्या खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करताना राज्यस्तरीय वरिष्ठ खेळाडूंकडून पाठीवर थाप मिळविली. या राष्ट्रीय स्पर्धेत माथेरान व्हॅली इंग्लिश मिडीयम स्कूलचे मोक्सीत दाबेकर, यश इंदलकर, दिशांत भोईर, निसर्गा गवळी, दिशा शेळके यांनी सुवर्ण पदकाला गवसणी घातली. तसेच, आदित्य आचार्य, प्रतिक खोकले, वेदिका पेरणे यांनी रौप्य पदक मिळवीत यश संपादन केले.

आपल्या शाळेच्या यशाबद्दल माथेरान व्हॅली इंग्लिश मिडीयम स्कूलचे भारत एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष गोपा कुमार नाय्यर आणि शाळेच्या मुख्याध्यापिका मृदुला पटेल यांनी अभिनंदन केले आहे. कोम बोकातोर स्पर्धेतील यशामध्ये शाळेचे प्रशिक्षक स्वप्निल अडूरकर यांचे मोठे योगदान राहिले आहे.

## रोहित, विराटचा शेवटचा विश्वचषक?



**नवी दिल्ली :** यूएसए आणि वेस्ट इंडिजमधील टी-२० विश्वचषक २०२४ भारताचे स्टार क्रिकेटपटू रोहित शर्मा आणि विराट कोहली यांच्यासाठी अखेरचे ठरण्याची दाट शक्यता आहे. टी-२० विश्वचषकासाठी रोहित शर्माकडे कर्णधारपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. दुसरीकडे, विराट कोहली आपली महत्त्वाची भूमिका बजावताना दिसणार आहे. असे असले तरी वर्ल्डकपनंतर दोन्ही स्टार खेळाडू टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेऊ शकतात.

# भारतीय महिलांचा दुसरा विजय

**। ढाका । वृत्तसंस्था ।**

भारतीय महिला क्रिकेट संघ सध्या बांगलादेश दौऱ्यावर आहे. या दौऱ्यात भारतीय महिला आणि बांगलादेश महिला संघात ५ सामन्यांची टी-२० मालिका सुरू आहे. या मालिकेतील दुसऱ्या सामन्यात भारतीय महिला संघाने डकवर्थ लुईस नियमानुसार १९ धावांनी विजय मिळवला. या विजयासह भारतीय महिला संघाने २-० अशी आघाडी घेतली आहे.

दुसऱ्या सामन्यात बांगलादेशने भारतासमोर १२० धावांचे लक्ष्य ठेवले होते. पण भारताने ५.२ षटकात १ बाद ४७ धावा केलेल्या असताना अचानक पावसाला सुरुवात झाल्याने हा सामना थांबला. त्यानंतर डकवर्थ लुईस नियमाचा वापर करत भारताला १९ धावांनी विजयी घोषित करण्यात आले. यावेळी भारताकडून गोलंदाजीत राधाने ४ षटकात १९ धावा देत ३ बळी घेतले, तर दिप्ती शर्माने ४ षटकात १४ धावांत २ बळी घेतले. याशिवाय श्रेयंकानेही ४ षटकात २४ धावांत २ बळी घेतले. तर, पुजा वस्त्राकरनेही १ बळी घेतला.

आता या दोन संघात तिसरा सामना २ मे रोजी होणार आहे. हा सामना जिंकून मालिका खिशात घालण्याची संधी भारतीय संघाला आहे.

### राधा, दीप्तीची धारदार गोलंदाजी



# रिंकू सिंगचे स्वप्न धुळीस?

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

आगामी टी-२० विश्वचषकासाठी भारतीय संघाची घोषणा करण्यात आली आहे. गेल्या आयपीएल हंगामात एका षटकात ५ षटकार मारून चर्चेत आलेल्या अलिगढचा २६ वर्षीय डावखुरा फलंदाज रिंकू सिंगला राखीव खेळाडू म्हणून संघात ठेवण्यात आले आहे. तर निवडकर्त्यांनी शिवम दुबेचा समावेश केला आहे. आयपीएलमधील बीसीसीआयच्या एका नियमामुळे पॉवर हिटर रिंकू सिंगचे विश्वचषक खेळण्याचे स्वप्न धुळीस मिळाले असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. कारण त्याला क्रिझवर जास्त वेळ घालवण्याची संधी मिळाली नाही. रिंकूला इम्पॅक्ट प्लेयर नियमाचा फटका बसत असल्याचे बोलेल जात आहे. तर, आयपीएलच्या चालू हंगामातील पहिल्या १० सामन्यांमध्ये चेन्नई सुपर किंग्जसाठी क्रीजवर जास्त वेळ घालवल्यामुळे दुबेला भारतीय संघात संधी मिळाली.



# मायकेल वॉनची भविष्यवाणी

## भारत उपांत्य फेरीत जाणार नाही

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

टी-२० विश्वचषकासाठी अवघ्या एका महिन्याचा कालावधी उरला आहे. वेस्ट इंडिज आणि अमेरिकेच्या धरतीवर टी-२० विश्वचषकाचा थरार रंगणार आहे. भारतासह अनेक देशांनी आपापले संघ जाहीर केले आहेत. क्रिकेटच्या सर्वात लहान फॉरमॅटच्या विश्वचषकाला सुरुवात होण्यापूर्वी दिग्गजांनी भविष्यवाणी करत आपला अंदाज वर्तवण्यास सुरुवात केली आहे. अशातच इंग्लंडच्या संघाचा माजी खेळाडू मायकेल वॉनने भविष्यवाणी करताना विश्वचषकातील चार सेमी फायनलिस्ट जाहीर केले आहेत.

२०२२ च्या टी-२० विश्वचषकात भारताला उपांत्य फेरीच्या सामन्यात इंग्लंडकडून पराभव पत्करावा लागला होता. भारतीय संघ पुन्हा एकदा रोहित शर्माच्या नेतृत्वात विश्वचषक खेळणार आहे. यासाठी टीम इंडियाची घोषणा झाली आहे. मायकेल वॉनने विश्वचषकाबद्दल भाष्य करताना मोठी भविष्यवाणी केली. त्याने सोशल मीडियाच्या माध्यमातून म्हटले की, यंदाच्या टी-२० विश्वचषकात माझ्या म्हणण्यानुसार, इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका आणि वेस्ट इंडिज हे चार संघ उपांत्य फेरी गाठतील. एकूणच वॉनने भारतीय संघ विश्वचषकाच्या उपांत्य फेरीत जाणार नसल्याचे म्हटले.

### भारतीय संघ

**रोहित शर्मा (कर्णधार), हार्दिक पांड्या (उपकर्णधार), विराट कोहली, यशस्वी जैस्वाल, सूर्यकुमार यादव, रिषभ पंत, संजू सॅमसन, शिवम दुबे, रवींद्र जडेजा, अक्षर पटेल, कुलदीप यादव, युझवेंद्र चहल, अर्शदीप सिंग, मोहम्मद सिराज, जसप्रीत बुमराह. राखीव खेळाडू– शुबमन गिल, रिंकू सिंग, आवेश खान, खलिल अहमद.**

### विश्वचषकासाठी चार गट

**अ– भारत, पाकिस्तान, आयर्लंड, कॅनडा, अमेरिका**
**ब– इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, नामिबिया, स्कॉटलंड, ओमान**
**क– न्यूझीलंड, वेस्ट इंडिज, अफगाणिस्तान, युगांडा, पापुआ न्यू गिनी**
**ड– दक्षिण आफ्रिका, श्रीलंका, बांगलादेश, नेदरलँड्स, नेपाळ.**

### स्टार खेळाडूला न्यायालयाचं समन्स

# दिल्ली कॅपिटल्सला मोठा धक्का

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

सोशल मीडिया एन्फल्युएन्सर सपना गिल विनयभंग प्रकरणात सत्र न्यायालयाने क्रिकेटपटू पृथ्वी शॉ याला समन्स बजावून न्यायालयात हजर राहण्याचे आदेश दिले आहेत. अंधेरीतील एका पबमध्ये सेल्फी काढण्यावरून झालेल्या वादानंतर शॉ आणि अन्य सहकाऱ्यांनी विनयभंग केल्याचा सपनाचा आरोप आहे. पृथ्वीला झालेल्या मारहाणीप्रकरणी सपनाला अटक झाली होती. त्यानंतर तिची जामिनावर सुटकाही झाली. सपनाने पृथ्वीसह त्याचा मित्र आशीष यादव आणि इतरांविरुद्ध विमानतळ पोलीस ठाण्यात विनयभंगाची तक्रार दाखल केली होती. तर शॉ आणि त्याचा मित्र आशिष यादव यांच्यावर बॅटने हल्ला केल्याचा आरोप देखील करण्यात आला आहे.

परंतु पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल न केल्याने सपनाने महानगर दंडाधिकारी न्यायालयात धाव घेतली. तक्रारीची दखल घेऊन दंडाधिकाऱ्यांनी ३ एप्रिल रोजी सांताक्रूझ पोलिसांना चौकशी करून १९ जूनपर्यंत अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते. परंतु पोलिसांवर कारवाई करण्याची सपनाची मागणी दंडाधिकारी न्यायालयाने फेटाळली आहे. अतिरिक्त सत्र न्यायाधीश डी. जी. ढोबळे यांनी मंगळवारी पृथ्वीसह विमानतळ पोलिसांनाही समन्स बजावले आहेत. गिलने आपल्या तक्रारीत भारतीय दंडाच्या कलम ३५४ (विनयभंग), ५०९ (शब्द, हावभाव किंवा हावभाव एखाद्या महिलेच्या प्रतिष्ठेचा अपमान करण्याच्या हेतूने) आणि ३२४ (स्वेच्छेने धोकादायक शस्त्रे किंवा साधनांनी दुखापत करणे) अंतर्गत एफआयआर नोंदविण्याची मागणी केली.

दरम्यान, पृथ्वी शॉने सपना विरुद्ध मारहाणीचा गुन्हा दाखल केला होता, तर दुसरीकडे सपना गिलने क्रिकेटपटूवर विनयभंगाचे आरोप केले होते. त्यामुळे प्रकरण आणखी वाढणार असं चित्र स्पष्ट झालं होतं.




### उबेर बॅडमिंटन करंडक स्पर्धा

# चीनकडून भारतीय महिलांचा पराभव

**। चेंगडू । वृत्तसंस्था ।**

**भारतीय युवा महिला बॅडमिंटन संघाचा उबेर करंडकातील 'अ' गटातील अखेरच्या साखळी फेरीच्या लढतीत चीनकडून पराभव झाला. चीनने या लढतीत भारतीय संघावर ५–० असा विजय साकारला. या विजयामुळे चीनच्या संघाने तीन गुणांसह पहिले स्थान पटकावले. भारताला दुसऱ्या स्थानावर समाधान मानावे लागले. चीन व भारत या दोन्ही संघांनी या गटातून बाद फेरीत प्रवेश केला आहे. याच गटातील अन्य लढतीत कॅनडाने सिंगापूरचा ५–० असा धुव्वा उडवला व तिसरा क्रमांक पटकावला.**

चेन यू फेई हिने एकेरीच्या पहिल्या लढतीत इशरानी बरुआ हिला २१-१२, २१-१० असे पराभूत करीत चीनला १-० अशी आघाडी मिळवून दिली. त्यानंतर चेन किंग - जिया फॅन या जोडीने प्रिया के. - श्रुती मिश्रा या भारतीय जोडीला २१-१३, २१-१२ असे सहज नमवले. हॅन युई - अनमोल खरब यांच्यामध्ये एकेरीची दुसरी लढत रंगली; पण ९-२१, १-४ अशा पिछाडीवर असताना अनमोल हिने दुखापतीमुळे माघार घेतली. त्यामुळे चीनला ३-० अशी विजयी आघाडी घेता आली. परतीच्या दुहेरीच्या लढतीत सिमरन सिंघी रितिका ठाकेर या भारतीय जोडीला पराभवाचा सामना करावा लागला. लिऊ शू - टॅन निंग या जोडीने भारतीय जोडीला २१-९, २१-१० असे सरळ दोन गेममध्ये पराभूत केले. अखेरच्या लढतीत तन्वी शर्मा हिलाही विजय मिळवता आला नाही. वँग यी हिने तन्वी हिच्यावर २१-७, २१-१६ अशी मात केली.



> माझ्या खेळावर मी नाराज आहे. माझ्याकडून खूप चुका झाल्या. चेन फेई हिने छान खेळ केला. माझ्यासाठी ही लढत आव्हानात्मक होती; पण चांगला अनुभव घेता आला.
>
> - इशरानी बरुआ, बॅडमिंटनपटू, भारत

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
**■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)